मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
नोंदणी क्रं. एफ.१६०९४(मुंबई)
सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन
मराठी भाषा विभाग
राज्य मराठी विकास संस्था
एल्फिन्स्टन तांत्रिक विद्यालय, ३, महापालिका मार्ग,
धोबीतलाव, मुंबई - ४००००१ दूरध्वनी : (०२२) २२६३१३२५ / २२६५३९६६
संकेतस्थळ https://rmvs.marathi.gov.in इ-पत्ता rmvs_mumbai@yahoo.com

निवेदन

महाराष्ट्र राज्याचे सांस्कृतिक धोरण २०१० अंतर्गत मराठी भाषेतील प्रतिमुद्राधिकाराची (कॉपीराइटची) मुदत संपलेले दुर्मिळ ग्रंथ महाजालावर उपलब्ध करून द्यावे असे म्हटले आहे. त्यानुसार मराठी भाषा विभागाच्या आदेशाप्रमाणे (शासननिर्णय क्र. रासांधो १०१२/ प्र. क./२०१२/भाषा-३ दि. २८ मार्च २०१३) राज्य मराठी विकास संस्थेद्वारे असे ग्रंथ आणि नियतकालिके महाजालावर उपलब्ध करून देण्याचा प्रकल्प राबवण्यात येत आहे. त्याच बरोबर प्रतिमुद्राधिकाराच्या कक्षेत येणारी काही साधनेही प्रतिमुद्राधिकारधारकांची उचित अनुमती प्राप्त झाल्यास संस्थेद्वारे संगणकीकृत करून अभ्यासकांसाठी उपलब्ध करून देण्यात येत असतात.

सदर प्रकल्पांतर्गत **विदर्भ साहित्य संघ, नागपूर** ह्या संस्थेद्वारे प्रकाशित करण्यात येणाऱ्या **युगवाणी** ह्या नियतकालिकाच्या अंकांचे संगणकीकरण करून ते सार्वजनिकरीत्या आणि विनामूल्य उपलब्ध करून देण्यासंदर्भात उपरोक्त संस्थेला आवाहनपर विनंती करण्यात आली होती.

सदर विनंती मान्य करून विदर्भ साहित्य संघाद्वारे सदर अंक संगणकीकरणासाठी उपलब्ध करून देण्यात आले. हे अंक सदर संस्थेच्या सहकार्यामुळेच आपल्याला संगणकीय स्वरूपात उपलब्ध होत आहेत.

या अंकांच्या पीडीएफ प्रती आपण विनामूल्य उतरवून घेऊ शकता. असे करताना खालील सूचना लक्षात घेऊन त्यांचे पालन करावे.

१. सदर ग्रंथांच्या पीडीएफ प्रती या वैयक्तिक वापरासाठी विनामूल्य उतरवून घेता येतील तसेच इतरांनाही विनामूल्य देता येतील. पण कोणत्याही कारणासाठी त्याचा व्यावसायिक वापर करता येणार नाही.
२. सदर ग्रंथांचे दुवे इतरांना देताना त्यासाठी कोणतीही रक्कम आकारता येणार नाही.
३. पीडीएफ प्रतींवर असलेली राज्य मराठी विकास संस्था, मुंबई व विदर्भ साहित्य संघ, नागपूर यांची मुद्रा आपणास काढता येणार नाही.
४. आपल्या अभ्यासासाठी, संशोधनासाठी या सामग्रीचा उपयोग करताना आपण योग्य तो श्रेयनिर्देश केला पाहिजे.

वरील अटींचा भंग झालेला आढळल्यास कायदेशीर कारवाई करण्यात येईल.

स्पष्टीकरण : सदर सामग्री ही केवळ ऐतिहासिक दस्तऐवज म्हणून उपलब्ध करण्यात आली असून या सामग्रीतून व्यक्त होणारी मते, विचारसरणी इ. त्या त्या लेखक, संपादक इ. कर्त्यांची आहे. त्यांपैकी कोणतेही मत, विचारसरणी इ. यांचा पुरस्कार महाराष्ट्र शासन, मराठी भाषा विभाग, राज्य मराठी विकास संस्था व विदर्भ साहित्य संघ, नागपूर यांपैकी कुणीही करत नसून त्या त्या मताचे वा विचारसरणीचे दायित्व उपरोक्त विभागांवर/ संस्थांवर असणार नाही.

सदर अंक केवळ अभ्यासकांच्या सोयीसाठी संगणकीय स्वरूपात उपलब्ध करण्यात येत असून अंकांतील सामग्रीचे (लेखन, मांडणी, छायाचित्रे, रेखाचित्रे इ.) प्रतिमुद्राधिकार त्या त्या लेखकांकडे अथवा प्रकाशकांनी त्या त्या वेळी केलेल्या व्यवस्थेनुसार आहेत ह्याची नोंद घेण्यात यावी. त्या सामग्रीसंदर्भातील कोणतेही अधिकार वा दायित्वे राज्य मराठी विकास संस्था, मराठी भाषा विभाग किंवा महाराष्ट्र शासन ह्यांच्याकडे असणार नाहीत.

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

मराठीचा विकास : महाराष्ट्राचा विकास

राज्य मराठी विकास संस्थेद्वारे
संगणकीकृत

अनुक्रमणिका

मराठीचा विकास : महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे
संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

युगवाणी
१९५८
जा, फे, [illegible], ए, मे, जून, जु, ऑ, सि – ६ अंक

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे
संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

साहित्य संघाचें मुखपत्र

ुगवाणी

या अंकांत

विदर्भ साहित्य संघ नाटयोत्सवाचा वृत्तांत

कै. भाऊजी दप्तरी स्मृती संदर्भ ग्रंथालय विदर्भ साहित्य संघ, नागपूर

कै. भाऊजी दप्तरी संदर्भ ग्रंथालय
36329
दाखल नोंद क्रमांक
दिनांक 10.2.98
92
विदर्भ साहित्य संघ नागपूर

विदर्भ साहित्य संघ, नागपूर
दुर्मिळ ग्रंथ संपदा

Rykulkarni

संपादक :
पां. कृ. सावळापूरकर

जानेवारी १९५७
किंमत आठ आणे

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत

विदर्भ साहित्य संघ

अनुक्रमणिका

संपादकीय ....

संसार - एक तात्विक दृष्टि ....

ग्रंथसमालोचन ....

विदर्भ साहित्य संघ, नाट्योत्सव १९५६ ....

नटवर्य श्री. केशवराव दाते यांचे अध्यक्षीय भाषण ....

संघवार्ता ....

विदर्भ साहित्य संघ, परी षा समिती वृत्त ....

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

वि. सा. संघाचें मुखपत्र

युगवाणी

संपादक :

पां. कृ. सावळापूरकर

संपादक मंडळ :

कृ. व्यं. पेशकार
मा. ल. व्यवहारे
व. कृ. वऱ्हाडपांडे
प्र. दे. कोलते
रा. ना. घाटोळे
भा. श्री. परांजपे
तु. ना. काटकर

वर्ष ११ वें : अंक १० वा

जानेवारी १९५७

संपादकीय

डॉ. भीमराव रामजी आंबेडकर

डॉ. भीमराव रामजी आंबेडकर यांना काळाने आमच्यांतून अकस्मात् ओढून नेलें, याबद्दल सर्व देशाला जें महान् दुःख झालें आहे त्यांत 'युगवाणी' ही सहभागी आहे. स्वतंत्र भारताचे घटनाकार, दलितांचे आधारस्तंभ, अव्वल दर्जाचे विद्वान आणि स्वतंत्र विचाराचे पुरस्कर्ते या नात्याने डॉ. आंबेडकर यांचें स्थान केवळ अद्वितीय होतें. त्यांच्या मृत्यूमुळे भारताची झालेली हानी भरून निघण्यासारखी नाही. वि. सा. संघ व 'युगवाणी' त्यांना आपली श्रद्धांजलि अर्पण करीत आहे.

कै. दाजी नागेश आपटे

महाराष्ट्रांतील सुप्रसिद्ध संशोधक व लेखक श्री. दाजी नागेश आपटे यांना १८ डिसेंबर १९५६ रोजीं बडोदें येथे देवाज्ञा झाली, याचें 'युगवाणी'स परम दुःख होत आहे. गेल्या टिळक शताब्दीच्या निमित्ताने लोकमान्यांच्या संशोधनावर व्याख्यानें द्यावयास विदर्भ साहित्य संघांत ते आले होते, हें अनेकांच्या स्मरणांत ताजें आहे. त्यांच्या मृत्यूने महाराष्ट्रांतील संशोधनाची व साहित्याची फार मोठी हानि झाली आहे. 'युगवाणी' आदरपूर्वक त्यांच्या आत्म्यास श्रद्धांजलि अर्पण करीत आहे.

नाट्यमहोत्सव

वि. सा. संघाच्या नाटयमहोत्सव समितीने अयोजित केलेला नाटयमहोत्सव यथासांग रीतीने पार पाडला. त्या प्रसंगाच्या निमित्ताने झालेलीं भाषणें व अन्य वृत्तांत याच अंकांत आम्ही देत आहोंत. या उत्सवाच्या निमित्ताने श्री. के. त्र्यं. दाते यांच्या-सारखे कलावंत व आमचे मुख्य प्रधान श्री. यशवंतराव चव्हाण हे दोन अधिकारी पुरुष आयन्तीं लाभले हें संकल्पित रंगमंच-कार्याच्या पूर्तीचें प्रसादचिन्हच होय असें आम्ही समजतों.

संमेलन

डिसेंबरांत योजलेलें वि. सा. संघ संमेलनाचें गोंदिया येथील अधिवेशन कांही अपरिहार्य कारणाने जानेवारींत दुसऱ्या किंवा तिसऱ्या आठवडयापर्यंत पुढे ढकलावें लागत आहे. तथापि हा अधिक अवधि मिळाल्यामुळे संमेलनाच्या यशांतहि कार्यकर्त्यांना तितकी अधिक भर घालतां येईल, यांत आम्हाला शंका नाही.

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

संसार — एक तात्विक दृष्टि

प्रा. नारायणशास्त्री द्रविड

संस्कृत वाङ्मयांतील 'संसार' 'जगत्' 'कर्मभूमि' वगैरे शब्दांचें तात्त्विक दृष्टीने किती महत्त्व आहे ह्याची कल्पना त्या शब्दांचा उठल्यासुठल्या प्रयोग करणाऱ्यांना फारशी असत नाही. इतर भाषांच्या (संस्कृतोद्भव नसलेल्या) वाङ्मयांत विश्वाचे वाचक कितीतरी शब्द असले तरी वरील शब्दांचे समानार्थक शब्द आढळत नाहीत. उदाहरणार्थ, इंग्रजीचा World हा शब्द 'Generation of men' पिढ्या किंवा Age 'युग' ह्या अर्थाच्या धातूपासून निष्पन्न झाला आहे. दुसरा इंग्रजीचा विश्ववाचक शब्द 'Universe' हा आहे. ह्याचा मूळ धातु 'एका आधारावर अधिष्ठित असलेले' अशा अर्थाचा आहे. ह्या दोन्ही शब्दांतून वरील शब्दांचा महत्त्वपूर्ण अर्थ तर निघत नाहीच, पण त्याचा ध्वनिदेखील ह्यांत दिसत नाही. याच्या उलट 'संसार' व 'जगत्' ह्या शब्दांतून भारतीय संस्कृतीचा जगाविषयीचा तात्त्विक दृष्टिकोण स्पष्टपणे ज्याप्रमाणे झळकतो तसा तो इतर शब्दांतून झळकत नसल्यामुळे ह्या शब्दांचें असामान्य महत्त्व मानावयास हवें असें पुढील तर्कांवरून वाचकांना कळून येईल.

'संसार' शब्द 'सृ' धातूपासून बनला आहे. 'सृ' धातूचा अर्थ 'सरण' 'हलणें' किंवा 'हालचाल' असा होतो. 'सम्' ह्या उपसर्गामुळे 'सतत हालचाल' किंवा 'गतिशीलता' असा 'संसार' शब्दापासून अर्थ निघतो. तसेंच 'जगत्' हा शब्द 'गम्' धातूपासून ('गच्छतीति जगत्' ह्या व्युत्पत्तीप्रमाणे) बनलेला आहे. म्हणून त्याचाहि वरीलप्रमाणे 'गतिशील वस्तु' असा अर्थ होतो. ह्या शब्दांचा विश्वासंबंधाने प्रयोग शास्त्रांत व व्यवहारांत फार प्राचीन काळापासून रूढ असल्यामुळे विश्व हें गतिशील आहे असा भारतीय तत्वज्ञांचा सिद्धांत ठरतो.

पण जें विश्व स्थिर दिसतें तें 'गतिशील' कसें म्हणावें व तसें म्हणण्याचा अभिप्राय काय असावा, असा प्रश्न ह्या ठिकाणीं उत्पन्न होतो. उत्तरादाखल आधुनिक भौतिकशास्त्राने केलेलें विश्वाचें विश्लेषण पुढे मांडतां येईल. भौतिकशास्त्रप्रमाणें जगाचीं मूलभूत तत्त्वें ब्याण्णव असून तीं 'एलेक्ट्रॉन', 'प्रोटॉन', पॉझिट्रॉन' 'न्यूट्रॉन' वगैरे सतत गतिशील परमाणूंच्या संघटनेपासून बनलेलीं आहेत. ज्या वस्तु आपल्याला स्थिर वाटतात त्या देखील गतिशील परमाणूंपासूनच बनलेल्या आहेत. उदाहरणार्थ, समोर असलेलें टेबल आपण स्थिर समजतों. पण भौतिकशास्त्र म्हणतें की अनंत वेगाने 'प्रोटॉन'च्या भोवतीं फिरणाऱ्या 'एलेक्ट्रान' पासून संघटित झालेल्या असंख्य अणूंचा पुंज हेंच टेबलाचें वास्तविक स्वरूप आहे. 'एलेक्ट्रॉन'चा वेग प्रकाशाच्या वेगा—(दर सेकंदास १८०००० मैल)—हून थोडा कमीच असतो. अशा वेगवान् अणूंनी बनलेला पदार्थ स्थिर कसा राहूं शकतो; याचें उत्तर असें आहे की परमाणूंची परस्पराकर्षणशक्ति (cohesion) व अणूंची परस्पर प्रयोजनशक्ति (Adhesion) इतक्या जबर असतात की त्या वस्तूचा आकार ढळूं देत नाहीत. याचा अर्थ असा की प्रत्येक वस्तु, गतिशील अणूंच्या पुंजांचें एक दृढ संतुलन (Stable equilibrium) असतें. (परमाणूंचें परस्पराकर्षण इतकें दृढ असतें की त्यांना परस्परापासून विलग करण्याने जी शक्ति निर्माण होते तिचा उपयोग अणुबांबच्या रूपानें केला जातो.)

याप्रमाणे सर्व भौतिक पदार्थांच्या मूलभूत अणूंची अन्तर्गत जी गति आहे ती जगाची आधारभूत (Fundamental) गति आहे. ही गति जगाचें

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

अधिष्ठान आहे. म्हणजें हिच्याशिवाय जगाचें संतुलन एक क्षणदेखील टिकाव धरूं शकत नाही. अणूंची गति थांबल्यास क्षणार्धांत जगाच्या ठिकऱ्या उडतील व ज्याला महाप्रलय म्हणतात ती अवस्था उद्भवेल. स्थिर पदार्थांच्या स्थिरतेवरच जगाची स्थिरता अवलंबून आहे, अशी जरी सर्वसाधारण समजूत असली तरी शास्त्रज्ञांच्या विचाराप्रमाणे अत्यंत अस्थिर तत्वांची अनन्त पण नियमित गतिशीलता हीच जगाच्या स्थिरतेचा (म्हणजे Equilibrium–संतुलनाचा) आधार आहे असें ठरतें. जगाची गतिशीलता (Dynamic nature) सिद्ध करण्यासाठी एवढा विचार देखील पुरेसा आहे; पण गति व स्थिरता यांच्या संबंधाचा उलगडा करण्यासाठी गतीच्या दृश्यमान जटिलतेचा (complexity) विचार करणें जरूर आहे.

उदाहरणादाखल एक जड पदार्थ घेऊं. एक धोंडा वरील विवेचनाप्रमाणे निरनिराळ्या तत्त्वांच्या अणूंच्या गतीचें एक स्थिर संतुलन आहे. कोणी धोंडा उचलून भिरकावला तर त्यांत एक नवी गति उत्पन्न झाली. ही गति त्याच्या मौलिक गतीहून निराळी असून हिचा घर्षणाच्या रूपानें धोंड्यावर परिणाम झालेला दिसून येतो. शिवाय, वारा, पाऊस वगैरे प्राकृतिक कारणांमुळे वेळोवेळीं किंवा क्षणोक्षणीं धोंड्यावर घडून येणारे फरक हे निराळे आहेतच. हे फरक देखील गतिरूपच मानले पाहिजेत. जरी आपण अवस्थान्तर किंवा स्थित्यंतराला गतिरूप समजत नाही, तरी अवस्थान्तराच्या कारणाचा विचार केल्यास त्यालाहि गतिरूप मानणें भाग पडेल. कारण धोंड्यांतील अणूंच्या संस्थानांत (किंवा संनिवेशांत) फरक पडल्याशिवाय त्याचें अवस्थांतर होऊं शकत नाही. आणि हा फरक अणूंच्या संयोजनामधें (Adhesion) बिघाड झाल्याशिवाय घडून येणें अशक्य आहे. म्हणजे अणूंची गति हीच धोंड्याच्या स्थित्यंतराचें मूल रूप आहे असें ठरतें.

जड पदार्थांच्या गतीच्या जटिलतेची कल्पना पृथ्वीच्या निरनिराळ्या गतींचा विचार केल्यानें कांहीशी येऊं शकते. पृथ्वीवरील अनंत पदार्थांच्या अनन्त प्रकारच्याच गतीचा विचार न करतां सबंध पृथ्वीच्याच गतींचा विचार केल्यास असें दिसून येतें की एकच पृथ्वी निरनिराळ्या दिशेने निरनिराळ्या धरातलांत निरनिराळ्या वेगाने फिरत आहे. प्रथम आपल्या आंसाभोवती १००० मैल ताशीं वेगानें पृथ्वी फिरत असते. नंतर जवळजवळ ६६००० मैल ताशीं वेगाने पृथ्वी सूर्याभोवती फिरते. यानंतर पृथ्वीचा आस २४००० वर्षांत आपली परिक्रमा पुरी करीत असल्यामुळे पृथ्वीची अयन चलनरूप तिसरी गति दिसून येते. तसेंच सूर्य हा सर्व ग्रहांबरोबर अभिजित् नक्षत्राच्या दिशेने धावत असल्यामुळे सूर्याबरोबर पृथ्वीला चवथीहि गति असते. अभिजित् नक्षत्र स्वतः स्थिर नसून एका विश्वाचें (G-alactic system) अंग असल्यामुळे त्यांतील गतीमुळे तेंहि गतिमान आहे. म्हणून त्याबरोबर सूर्य व त्याचा सर्व परिवार (Solar system), अर्थात् पृथ्वीदेखील तदनुरूप गतिमान आहे. पण अभिजित् ज्या विश्वाचें अंग आहे तसलीं कोट्यवधि परस्पर संबद्ध गतियुक्त विश्वें महान् विश्वांत (Universe) सामावलेलीं असल्यामुळें त्या सर्वांच्या निरनिराळ्या गत्या क्रमाक्रमानें पृथ्वीपर्यंत पोचतातच. अशा अनंत गतींचें बरोबर ज्ञान झाल्यास पृथ्वीसारखा एकच ग्रह एकाच वेळीं असंख्य गतींनी युक्त आहे, असें दिसून येईल. असें असूनहि दिसायला पृथ्वी स्थिरच आहे. याच्या उलट आकाशांत उदयास्त होणारा सूर्य पृथ्वीच्या तुलनेंत स्थिरच आहे असें ज्योतिषशास्त्र सांगतें.

या दोन उदाहरणांवरून जड व स्थिर वाटणाऱ्या वस्तूंची असाधारण गतिशीलता सिद्ध होते. पण गतीची जटिलता उमगण्यांत इतकें निरीक्षणहि अपर्याप्त आहे. चेतन पदार्थांची गतिशीलता जड पदार्थांच्या गतिशीलतेपेक्षा अनंतपटीने जटिल आहे व चेतनांत श्रेष्ठ चेतन जो माणूस त्याच्या गतिमत्तेची तर मर्यादाच नाही असें पुढील विवेचनावरून दिसून येईल. मूलभूत आणविक गतीच्या बाबतींत जड व चेतन पदार्थांत साम्य असले तरी एका बाबतींत पूर्ण वैषम्य असतें. जड पदार्थांत वाढ (growth) होत नाही पण चेतन पदार्थ वाढीमुळेच चेतन म्हणविण्यास पात्र होतो. एककोषी (unicellular organism) अमीबा(Amoeba)

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

पासून माणसापर्यंत सर्व प्रकारच्या चेतन पदार्थांत आपली वाढ करून घेण्याची लायकी स्पष्ट दिसून येते. वाढीप्रमाणे ऱ्हासहि (जीवशास्त्राच्या नियमाप्रमाणे नव्हे) चेतन पदार्थांतच दिसतो. जड पदार्थांची वाढ किंवा ऱ्हास प्राकृतिक नियमांप्रमाणे होत असतात पण चेतन पदार्थांचे वाढ व ऱ्हास जीवशास्त्राच्या नियमांप्रमाणेच होतात. उदाहरणार्थ, बी जमिनींत पेरल्यावर त्याचीं बाह्य शकलें कुजणें प्राकृतिक नियमाप्रमाणें घडतें. पण बीला अंकुर फुटणें हें वनस्पतिशास्त्र किंवा जीवशास्त्राच्या नियमाप्रमाणें होतें. कारण जड व चेतन पदार्थ यांच्या स्वरूपपरिवर्तनाचे नियम सारखे नसतात. कारण जड पदार्थांचें परिवर्तन बहुतेक बाह्य परिस्थितीवर अवलंबून असतें व चेतनाचें परिवर्तन परिस्थितीपेक्षा त्यांच्या आन्तरिक स्थिति किंवा प्रयत्नावरच जास्त अवलंबून असतें.

चेतनपदार्थांची वाढ किंवा ऱ्हास हेहि गतीचेच विशिष्ट प्रकार आहेत असें विचारान्तीं दिसून येतें. ज्या प्रक्रियां (Metabolisn) मुळे शारीरिक वाढ होत असते त्या प्रक्रिया रासायनिक मिश्रण व निरनिराळ्या यौगिका (Compound) च्या निर्मितीच्या स्वरूपाच्या असल्यामुळे त्यांना निरनिराळ्या शरीरान्तर्गत पदार्थांच्या क्रियेची अपेक्षा असतेच. ही क्रिया क्षणभरहि थांबत नाही. शरीरान्तर्गत पदार्थांची क्रिया सारखी चालू राहण्यासाठीच शरीराला Circulatory system ची अपेक्षा असते. वरून जरी शरीर स्थिर वाटत असलें तरी शरीराच्या आंत सतत क्रिया चालूच असते. गाढ निद्रेच्या अवस्थेंत देखील शरीराचें Metabolism बन्द पडत नाही. हिमप्रदेशांत राहणारे कांही प्राणी हिवाळ्यांत मृतप्राय अवस्थेंत पडलेले असतात. तशा स्थितींतहि त्यांचें शरीर अगदीच क्रियाशून्य झालेलें नसतें. त्यांच्या क्रिया फक्त मन्द पडलेल्या असतात, असें शास्त्रज्ञांचें म्हणणें आहे. 'प्राण,' 'चैतन्य,' 'श्वासोच्छ्वास' वगैरे सगळेच जीवनबोधक शब्द क्रियाबोधक आहेत. एवढ्यावरूनच जीवन हें क्रिया रूप आहे असें स्पष्ट सिद्ध होतें.

माणसासारख्या विचारवान प्राण्याची गतिशीलता जड पदार्थ, स्थावर प्राणी (वनस्पती वगैरे) व इतर जंगम प्राणी या सर्वांच्या पेक्षा अनन्तपटीनें जटिल असते. माणसाची जशी शारीरिक वाढ होते तशीच बुद्धि, भावना, इच्छादिकांमुळे त्याची मानसिक वाढहि होते. मन व त्याचे धर्म—बुद्धि, भावना, इच्छा वगैरे—शरीराच्या निरनिराळ्या अंगांप्रमाणे भौतिक पदार्थ नसले तरी त्यांचें कोणत्या ना कोणत्या तरी रूपानें अस्तित्व भौतिक वादी शास्त्रज्ञांनीहि मान्य केलेलें आहे. प्रसिद्ध पाश्चात्य तत्वज्ञ बरट्रँड रसेल इच्छा एक Force आहे व ज्ञान व भावना संवेदना किंवा उत्तेजनेचे विशिष्ट प्रकार आहेत असें आपल्या (Analysis of Mind) या पुस्तकांत म्हणतो. पण तो यांचें अस्तित्व व इतर (भौतिक) प्रकारच्या Force व उत्तेजनांहून यांचा वेगळेपणा नाकारीत नाही. मन व मनोवृत्तींचें अस्तित्व कोणत्याहि रूपानें मान्य केल्यावर त्यांची क्रियात्मकता सिद्ध करणें कठिण नाही. मानसशास्त्राच्या (Every psychosis is followed by a neurosis) मनोवृत्तीचा परिणाम स्नायूंवर झाल्याविना रहात नाही या प्रसिद्ध नियमाप्रमाणे शारीरिक क्रिया, तज्जन्य बाह्य वस्तूंच्या क्रिया व मनोवृत्ति यांच्यांत अभिन्न संबंध असल्यामुळे मनोवृत्तींची क्रियात्मकता मान्य करावीच लागते. जें स्वतः क्रियाशील नाही त्यांच्या प्रेरणेमुळे कोणतीहि क्रिया कधीच उत्पन्न होऊं शकत नाही.

मनोवृत्ति किंवा मनोविकारांपैकी प्रयत्न किंवा इच्छेची (क्रियात्मकता) गतिशीलता सामान्य माणसाला देखील जाणवते. इच्छा लुप्त असतांना शरीराला जें शैथिल्य असतें तें दृढ इच्छा मनांत जागृत झाल्याबरोबर तत्काळ नाहीसें होतें व मनाला व शरीराला कार्य करण्याचें स्फुरण चढतें व शरीराचीं कार्यक्षम अंगें अपेक्षित हालचाल करण्यास तत्पर होतात. रसेलने इच्छेला Force चा एक प्रकार जें म्हटलें आहे तें तिच्या गतिशील स्वभावाला साजेसेंच आहे. भारतीय दर्शनांतील एका संप्रदायानेहि इच्छेला 'इच्छाशक्ति' म्हणून वर्णिलेलें आहे. इच्छेच्या गतिशीलतेचे अनेक पुरावे देतां येतील. पण ज्ञान व भावना या मनोवृत्तींच्या गतिशीलतेचें बरोबर आकलन करणें जरा कठिण आहे. यासाठी 'स्थिरता' म्हणजे काय व

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

तिचा गतीशीं कोणत्या प्रकारचा संबंध आहे ह्या पूर्वी निर्देशिलेल्या प्रश्नाचा विचार करणें प्राप्त आहे.

स्थिरतेविषयी विचार करतांना कांही महत्वाच्या गोष्टी लक्षांत घ्यावयास पाहिजेत. पहिली गोष्ट अशी की स्थिरता व गति यांच्यांत मूलगामी (Radical difference) फरक आहे, अशी सर्वसाधारण कल्पना सपशेल चुकीची आहे. दुसरी गोष्ट अशी की गतीची अत्यंत जटिलता किंवा गतीची अनन्तता याहून स्थिरता निराळी नाही. तिसरी गोष्ट अशी की पदार्थांची गति जसजशी वाढत जाते तसतशी त्याची भौतिकता (Materiality) किंवा जडता कमी कमी होत जाते. म्हणूनच जो पदार्थ जितका जास्त गतिमान तितकाच तो भौतिकतेहून दूर व चैतन्याच्या जवळ येतो. चौथी गोष्ट अशी की ज्या पदार्थांत गतीची परमावधी दिसून येईल तोच पदार्थ पूर्ण स्थिर म्हणतां येईल. पांचवी गोष्ट अशी की जड-चेतन, भौतिक-अभौतिक, स्थूल-सूक्ष्म हे भेद पदार्थांच्या रचनेवर अवलंबून नसून त्यांच्या गतींच्या कमीजास्त प्रमाणावर अवलंबून आहेत. सहावी गोष्ट अशी की गतीची परमावधि प्रकाशाच्या गतींत होते हें सापेक्षतावादाचें मत तात्त्विक दृष्टीने बरोबर नसून प्रकाशापेक्षाहि अधिक गतिमान् तत्त्वाची कल्पना करणें आवश्यक आहे.

वर सिद्ध केल्याप्रमाणे सर्व भौतिक पदार्थांची गतिशीलता व स्थिरता यांच्यांतील वास्तवित अभेद मान्य केल्यास वरील सर्व कल्पना युक्तिसंगत आहेत असें स्पष्ट दिसून येईल. सर्व भौतिक पदार्थ सतत गतिमान आहेत; गति हाच त्यांचें जीवित किंवा संतुलनात्मक अस्तित्वाचा आधार आहे, ही गोष्ट भौतिक शास्त्रांनीच जगापुढें आणली आहे. सापेक्षतावादापूर्वीच्या भौतिक शास्त्राला देखील ही गोष्ट माहित होती. सापेक्षतावादाने या विचाराच्याहि पलीकडे जाऊन 'वस्तु'चें अस्तित्वच खोडून काढलें व तिच्या जागीं 'घटना'—(Event)—त्मक जगाची स्थापना केली. विश्व जड पदार्थ स्वरूप तर नाहीच पण चल पदार्थरूपहि नाही. तर तें घटनात्मक आहे असें सापेक्षतावादाने सिद्ध करून दाखविल्यावर भौतिक जगताविषयीचा न्यूटनच्या विचारांनी प्रभावित असलेला शास्त्रज्ञांचा दृष्टिकोन बदलला व ते, जग प्रक्रियात्मक (Process) आहे असें म्हणूं लागले. या कल्पनेचे तात्त्विक निष्कर्ष किती दूरगामी आहेत या गोष्टीकडे हॉल्डेन, व्हाइटहेड वगैरे पाश्चात्य तत्त्वज्ञांनी विचारकांचें लक्ष आकृष्ट केलें आहे. पण वरील निष्कर्ष देखील या कल्पनेपासूनच काढतां येतात असें दाखविण्याचा कोणाहि तत्वज्ञानें प्रयत्न केलेला आढळत नाही.

दृश्य जग जर प्रक्रियात्मकच असलेलें दिसून येतें तर अदृश्य आध्यात्मिक जग देखील तसेंच असायला पाहिजे, असें म्हणायला आधार शोधण्याची गरज नाही. चैतन्य, मन व आत्मा यांचें देखील अस्तित्व (आधुनिक मानसशास्त्राप्रमाणेहि) सतत परिवर्तमान अवस्थां—(किंवा वृत्ति, states of mind or consciousness)—वरच अवलंबून असल्यामुळे मानसिक प्रक्रिया बाह्य जागतिक प्रक्रियांसारख्याच असल्या पाहिजेत असें सकृद्दर्शनीं वाटतें. पण मानसिक जगताच्या अभौतिकते-(किंवा सूक्ष्मता subtlety)-चा विचार केल्यास बाह्य जगत् हेंच खरें व मानसिक जगत् त्याचा परिणाम आहे, त्याचें स्वतंत्र अस्तित्व नाही, अशा प्रकारच्या विरुद्ध कल्पना सामान्य माणसाला जडवादी बनवितात. जगांत पूर्णपणे जड असें काहीच नाही, उलट ज्या भौतिक पदार्थांना जड समजण्यांत येतें ते प्रकाशाइतकेच (जवळजवळ) गतिमान आहेत हें तत्त्व आकलन केल्यावर न्यूटनच्या वेळेपासून चालत आलेली पदार्था(matter)ची जड (Inert) अशी परिभाषा मान्य करतां येत नाही व जड चेतनांमधील फरक निराळ्या प्रकारें करणें भाग पडतें.

मन व चैतन्य अत्यंत वेगवान् असल्याची कल्पना उपनिषदांत व इतर देशीय प्राचीन वाङ्मयांत देखील सापडते. वेगाच्या पराकाष्ठेचें वर्णन करण्यास मनाच्या उपमेचाच प्रायः उपयोग केला जातो. पण शास्त्रज्ञ (scientists) या उपमेला महत्त्व देत नाहीत. कारण मनाचें (त्याच्या अभौतिकतेमुळे) स्वतंत्र अस्तित्व मानायला ते तयार नाहीत. पण 'गतीची अनन्तता हीच स्थिरता आहे' हा वर निर्देशिलेला

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

सिद्धान्त लक्षांत घेतल्यास मनाला वेगवान मानण्यास कांहीहि हरकत नाही, असें दिसून येईल. वेदान्त्यांनी अन्तःकरणाला गतिमान व संकोच—विकासशील मानलेलें आहे व इंद्रियांच्या मार्गानें बाह्य विषयाकडे त्याचें गमन होतें असें म्हटलें आहे. ह्या कल्पनेला तात्विक महत्वच दिलें जातें, पण शास्त्रीय दृष्टीनेहि ही कल्पना ग्राह्य आहे असें सिद्ध करण्याचा हा प्रयत्न आहे.

यासाठी प्रथम गति व भौतिकता यांचा संबंध कशा प्रकारचा आहे हें ठरवणें आवश्यक आहे. आणविक गतीचा विचार बाजूला ठेवून स्थूल पदार्थांच्या गतीचाच विचार केल्यास असें दिसतें की पदार्थाची गति जसजशी वाढत जाते, तसतशी त्याची भौतिकता (घनता Density) कमी होत जाते. हलके पदार्थ स्वभावतःच गतिमान असतात (पृथ्वीचें आकर्षण त्यांच्यावर कमी असतें ही गोष्ट निराळी) व त्यांची गति वाढविणें अवघड नसतें. पण घन पदार्थांत गति उत्पन्न करणें व ती वाढविणें या दोन्ही गोष्टी कठीण असतात. कारण घनत्वामुळें पदार्थाचा व्याप (Volume) व त्यांच्यावरील घर्षण (Friction) दोन्ही वाढतात व त्यामुळे त्यांची गति मन्दावते. घर्षण कमी करण्यासाठीच आजकाल Streamlining चा विमान, मोटार वगैरेंत उपयोग करतात. म्हणून पदार्थाचा वेग जास्तींत जास्त करण्यास त्याच्या घनत्वाची अडचण दूर करणें आवश्यक असतें. जगांतील सर्वांत अधिक गतिमान समजला जाणारा पदार्थ-प्रकाश- (दर सेकंदास १८६००० मैल) अत्यंत कमी घनत्वाचा आहे. सापेक्षतावादाप्रमाणे एक चौरस मैल व्यापणारा सूर्यप्रकाश वजनांत कांहीं औन्सच भरतो. प्रकाशापेक्षा अधिक विरल व अधिक वेगवान पदार्थ जगाला उपलब्ध नसल्यामुळे व 'दिक्काल संस्थाना' (Space-time Continues) च्या कल्पनेला पोषक असल्यामुळें सापेक्षतावादाला प्रकाशाचा वेग जगांतील गतीची परमावधी म्हणून विश्वकोषीय स्थिरांक (Cosmical constant) असा मानावा लागला.

प्रकाशाची गति अनंत असून तो गतिमान न वाटतां स्थिर वाटतो याचें कारण त्याच्या गतीची अनंतताच आहे असें मानल्यावर प्रकाशापेक्षा जास्त गतिमान् तत्व असल्यास तें कसें असू शकेल याची कल्पना करतां येते. प्रकाशांत थोडी तरी घनता आहे म्हणूनच त्याची गति मोजतां येते. पण चैतन्यांत (किंवा वेदान्ताच्या परिभाषेप्रमाणे अन्तःकरणांत) घनत्व अत्यंत सूक्ष्म असल्यामुळे त्याचा वेग प्रकाशाच्या वेगापेक्षाहि जास्त असलाच पाहिजे. क्षणार्धांत संपूर्ण विश्वाचें आकलन करूं शकणारें चैतन्य (किंवा मन) अपरिमेय वेगवान आहे, असें मानण्यास वास्तविक कांही हरकत असूं नये. चैतन्य दृश्य नाही येवढ्यावरूनच त्याचें शरीराव्यतिरिक्त अस्तित्व नाही अशी विचारसरणी कशी चुकीची आहे हें वरील विवेचनावरून स्पष्ट होतें. जो पदार्थ जितका जास्त भौतिक तितकाच तो जड म्हणजे कमी गतिमान (भारतीय दर्शनाच्या परिभाषेप्रमाणे 'स्थूल' व जो पदार्थ जितका कमी भौतिक म्हणजे 'सूक्ष्म') तितकाच तो जास्त वेगवान असें समीकरण ठरवल्यावर चैतन्याचें 'सूक्ष्मत्व' 'अदृश्यत्व' व 'अनन्त गतिमत्व' आपोआप सिद्ध होतें. चैतन्य दृश्य नाही कारण ज्या इन्द्रियांनी किंवा उपकरणांनी त्याचें दर्शन करावयाचें तीं भौतिकच असल्यामुळे तीं अत्यंत सूक्ष्म असलेल्या चैतन्याचें आकलन करूं शकत नाहीत. सूक्ष्मतेमुळेच चैतन्याची अनंत गतिमत्ता (दार्शनिक परिभाषेप्रमाणे 'विभुता') ही सिद्ध होते. पण भारतीय तत्त्वज्ञ व्यक्तिचैतन्याला मर्यादितच मानतात. जोंपर्यंत सर्व भौतिक बंधनांचा उच्छेद होऊन व्यक्तिचैतन्याचा विश्वचैतन्यांत समावेश होत नाही तोंपर्यंत भौतिक जगत् कायमच राहतें असें त्यांचें म्हणणें आहे. त्यांच्या मतें विश्वचैतन्य अत्यंत सूक्ष्म व म्हणूनच पूर्ण विभु (म्हणजे वास्तविक अर्थानें 'अनन्त गतिमान्,' म्हणूनच स्थिरतेच्या वरील परिभाषेप्रमाणें 'पूर्ण स्थिर') आहे. व व्यक्तिचैतन्य या चैतन्याचा अंशमात्र आहे. उपनिषदांत आढळणारी ब्रह्माचीं विरोधाभासात्मक वर्णनें भारतीय दर्शनाप्रमाणे व वरील विचारसरणीप्रमाणेंहि अगदी सयुक्तिक ठरतात.

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

उदाहरणार्थ, ईशोपनिषदाचा खालील मंत्र पहा:—

'अनेजदेकं मनसो जवीय:
नैनद्देवा आप्नुवन् पूर्वमर्षत्।
तद्धावतोऽन्यानत्येति
तिष्ठत्तस्मिन्नपो मातरिश्वा दधाति ॥'

ब्रह्म, गतिरहित (म्हणजे वर म्हटल्याप्रमाणे 'स्थिर') असूनहि मनापेक्षाहि जास्त वेगवान् आहे; तें इंद्रियांच्या कक्षेपलीकडे असतें; इतर वेगवान् पदार्थांहूनहि तें जास्त वेगवान आहे व तें स्थिर असल्यामुळेच सर्व जागतिक प्रक्रिया त्याच्या आधारें चालू असतात. जें ब्रह्म स्थिर तेंच मनापेक्षाहि जास्त गतिमान असण्याचें कारण वर विस्ताराने सांगितलेंच आहे. इंद्रियांपलीकडे, 'ब्रह्म' पूर्वीच पोचलेलें आहे या वर्णनाचें तात्पर्य देखील वरील विवेचनावरूनच स्पष्ट होतें. अनन्त गतिमान असलेल्या ब्रह्माच्या दृष्टीनें 'जाऊन पोचणें' 'जाणें' व 'सर्वत्र व्याप्त असणें' या तिन्ही प्रक्रियांत कांहीही फरक असणें संभवनीय नाही. तसेंच, असें अनंत गतिमान ब्रह्म अत्यंत सूक्ष्म असल्यामुळेच त्यावर सर्व स्थूल प्रक्रिया आधारलेल्या आहेत असें त्याचें वर्णन सयुक्तिक ठरतें.

याप्रमाणे विश्व प्रक्रियात्मक आहे; त्यांतील स्थिरता व क्रियाशीलता यांच्यांत वास्तविक भेद नाही; प्रकाशापेक्षा जास्त गतिमान तत्व चैतन्य हें आहे; पदार्थांची सूक्ष्मता त्यांच्या गतीच्या आधिक्यावर अवलंबून आहे; स्थूल व सूक्ष्म यांच्यांत गतीच्या कमी-जास्तपणामुळेच फरक पडतो; सूक्ष्मांतूनच क्रमश: गतिमांद्यामुळे स्थूलाची उत्पत्ति होते; अत्यंत सूक्ष्म अशा चैतन्यापासून स्थूल प्रक्रियात्मक विश्वाची उत्पत्ति होते व या सर्व कारणामुळेच विश्वाचें 'संसार' हें अभिधान सार्थ ठरतें.

विदर्भ साहित्य संघाचीं प्रकाशनें

१. निबंध परिमल (निवडक मौलिक निबंधांचा संग्रह) रु. २–४–०
२. सुमन संचय (कविता संग्रह) रु. १–४–०
३. मराठी गद्य (मराठी साहित्यांतील निवडक वेचे) रु. १–८–०
४. अंमलदार (नाटक) लेखक–श्री पु. ल. देशपांडे रु. २–०–०
५. भारती (नाटक) लेखक–श्री नाना जोग रु. १–८–०
६. हिंदी मराठी भाषा प्रवेशिका लेखिका–श्रीमती मालतीबाई श्रीखंडे रु. ०–१२–०

कै. राम गणेश गडकऱ्यांच्या साहित्यावरील अभ्यासपूर्ण प्रबंध

१. वाग्वैजयंतीचें पुनर्मूल्यन —डॉ. मा. गो. देशमुख रु. ०–६–०
२. नाटककार गडकरी —श्री. द. रा. गोमकाळे रु. ०–६–०
३. गोविंदाग्रज यांचा कवि या नात्याने विचार—कविभूषण अण्णासाहेब खापर्डे रु. ०–८–०
४. गडकऱ्यांच्या नाटकांतील स्वगत —प्रा. श्री. मा. कुळकर्णी रु. ०–८–०
५. सतारीचे नव्हे! एकतारीचे बोल —श्री. द. वि. तेंडुलकर (प्रफुल्लदत्त) रु. ०–८–०

सरचिटणीस, विदर्भ साहित्य संघ, केन्द्रीय कार्यालय, उत्तर अंबाझरी रस्ता, नागपूर १

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

ग्रंथ समालोचन

काजळी रात्र (कादंबरी)

(लेखक—श्री. ना. रा. शेंडे; प्रकाशक : सुरस ग्रंथमाला, सोलापूर; पृ. २०८, मूल्य १ रु. १४ आणे.)

श्री. ना. रा. शेंडे यांच्या साहित्यिक संकल्पपूर्तीला कारणीभूत झालेलें हें त्यांचें तिसरें पुस्तक. याच संकल्पसाखळींतील त्यांचीं इतर दोन पुस्तकें यापूर्वींच प्रकाशांत आलीं आहेत. श्री. शेंडे यांची ही कादंबरीहि रसिकांच्या मनाला आनंद देणारी आहे यांत शंका नाही !

प्रस्तुत कादंबरी ही यापूर्वींच नागपूर येथील 'सुषमा' मासिकांतून क्रमशः प्रकाशित झाली होती व त्याच वेळीं तिचें वाचनहि घडलें होतें. पण, बहुधा भागशः वाचण्यांत आल्यामुळे असेल, ती मला तेवढीशी आवडली नव्हती, हें प्रांजळपणें मान्य करतों. व परीक्षणार्थ तिचें वाचन करण्यापूर्वी माझी मनोवस्था कांहीशी प्रतिकूलच होती—निदान अनुकूल तरी खासच नव्हती ! पण एकत्रित स्वरूपांत तिचें वाचन घडलें, आणि माझ्या मनावरचें प्रतिकूलतेचें कवच गळून पडलें !—कोणत्याहि ललित कृतींत तिचा वाचकाच्या मनावर होणारा एकसंध परिणाम हा महत्वाचा मानला जातो; त्या दृष्टीनें पाहिलें तर या कादंबरीच्या बाबतींत लेखकाची लेखणी सफल झाली आहे असें म्हणावें लागतें !

ह्या कादंबरींत एकूण तेरा रात्री आहेत. लेखकानें तिचें वर्णन करतांना 'ग्रामीण जीवनावर आधारलेली कादंबरी' असें म्हटलें आहे ! स्वतः लेखकानें केलेल्या 'आत्मकथनां'त प्रस्तुत कादंबरीच्या भूमिकेचें दर्शन घडतें तें असें : 'परिस्थितीची भयानक काजळी रात्र खेड्यापाड्यांना ग्रासत आहे, खेडूत जनता निराशेचे उसासे टाकीत आहे—दीन दुबळ्यांची करुण अवस्था हृदयाला घरें पाडीत आहे, त्यांच्या कढत अश्रूंचे चटके असह्य होत आहेत, या जाणिवेनें मी कथानकाची पार्श्वभूमि तयार केली; आणि दिवसेंदिवस घट्ट होत जाणाऱ्या या रात्रीला न भितां, निर्धारानें प्रवास करून प्रकाशाचा थोडा तरी झोत गवसण्यास कांही करतां येणें शक्य आहे का, याचा धागा शोधण्याचा प्रयत्न केला. विषमता नष्ट व्हावी व समता राखली जावी, जातिभेद साफ झुगारला जाऊन दारिद्र्यांत होरपळत असलेला खालचा थर उन्नत व्हावा आणि पर्यायानें ग्रामविकास साधला जावा, या कल्पनेनें मी कादंबरीचा देह निर्माण केला; आणि ब्राह्मण, ब्राह्मणेतर व दलित यांच्या युतीनें तिचा आत्मा घडविला !'

कादंबरीच्या वरील भूमिकेवरून तिचें परीक्षण करणें अवश्य आहे. पण स्थलाभावीं तसें करणें मनांत असूनहि शक्य नाही !—मात्र ज्या ग्रामीण जीवनावर ही कादंबरी आधारलेली आहे असें लेखक म्हणतात, त्या ग्रामीण जीवनाचें स्पष्ट चित्र मात्र कादंबरी वाचून डोळ्यापुढें उभें राहूं शकत नाही. निदान ग्रामीण जीवन या शब्दांतून ध्वनित होणाऱ्या प्रतिमेचा मागोवा घेत जर एखाद्या वाचकानें, भारतीय ग्रामजीवनाचें प्रातिनिधिक चित्रण ह्या कादंबरींत पाहण्याचा प्रयत्न केला तर त्याची थोडी निराशाच होईल ! थोडी असें मी मुद्दामच म्हणतों, कारण आजचें ग्रामस्थ दारिद्र्य, तेथील लोकांचे हेवेदावे, ह्यांचा आढळ कादंबरींत होत नाही असें नाही. पण त्याची ठसठशीत आकृति वाचकाच्या मनःपटलावर उमटूं शकणार नाही, असें मला वाटतें !—आणि याला कारणहि आहे. या कादंबरीचें कथानक दोन पदरी आहे व त्यांची वीण थोडी सैल आहे. तें पुरेसें एकात्म झालेलें नाही. आणि याच कारणामुळे वाचकाचें मन द्विधा होतें. आपण दोन वेगळ्या

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

विश्वांत भ्रमत आहोंत असा चमत्कारिक आभास त्याच्या मनांत निर्माण होतो. 'बुद्धि, भावना आणि विचार यांना आपल्या संमीलनाचें केंद्र झटकन सापडत नाही,' या शब्दांत प्रस्तावनाकर श्री. वि. स. खांडेकर यांनाहि हेंच सांगावयाचें आहे असें वाटतें !–

पण केवळ 'कथानकाचें प्राधान्य' या कादंबरींत नाही असें मला म्हणायचें आहे. कथानकाचा आधार घेऊन जीं व्यक्तिचित्रें लेखकाने निर्माण केलींत, तीं महत्त्वाचीं आहेत. विचारप्रवण करणारीं आहेत !– दयाळबावा, सरू, मोहन, कृष्णा महार, भाऊराव मुनीम हीं सारीं महत्त्वाचीं पात्रें मानवी आहेतच. त्याचीं मनें कृतज्ञ आहेत. 'माणसा' विषयीच्या सहानुभूतीने ओतप्रोत भरलीं आहेत. पण अंभोऱ्याचा 'अट्टल बदमाष' म्हणून गाजलेला जगू ढीवर, त्याचाच मित्र रामू, कोरंबीचा म्हातारा गरीब शेतकरी शंभूबावा या साऱ्या सामान्यांच्या अंतःकरणांतल्या विराट माणुसकीचें जें जागरण या कादंबरींतून व्यक्त झालेलें आहे, तें महत्त्वाचें आहे. शहराच्या व्यवहारी वाऱ्याचा झोत अद्यापि चाटून न गेल्यामुळे टिकून राहिलेलें ग्रामीण निष्कपट जीवन अत्यंत चांगल्या व प्रत्ययकारी रीतीनें कुठे जाणवत असेल तर तें पांचव्या रात्रींत ! ही सारीच रात्र मुळांतून वाचावी इतकी मनोरम आहे. कादंबरींत वाईट वृत्तीचीं पात्रेंच नाहीत असें नाही. दयाळबाबाचे उपकार न स्मरणारा धनजी पाटील, गोंदू कोतवाल, रामभरोस हीं आजच्या जगांत पासरीने सांपडणाऱ्या कृतघ्न व काकवृत्तीच्या माणसांचीं प्रतीकें आहेत; पण शेवटीं कृतकर्माचा पश्चात्ताप त्यांना होतो हें सांगून मनुष्याच्या आंतरिक चांगुलपणावरचा आपला विश्वास लेखकाने प्रगट केला आहे! 'आर्कनी' हें पात्रहि मनावर परिणाम करणारें वाटतें. अज्ञात इसमावर मुग्ध प्रेम करणारी ही अबोल ख्रिश्चन तरुणी निःस्वार्थ सेवेचें प्रतीक असून मनाला चुटपूट लावण्याचें सामर्थ्य तिच्या व्यक्तिरेखेंत निश्चितच आहे !

श्री. ना. रा. शेंडे यांच्या यशांत या कादंबरीने निश्चित भर पडेल असें भविष्य, कादंबरीच्या स्वरूपावरून, ज्योतिषाचा अभ्यास नसलेल्या व्यक्तीनेंहि खुशाल वर्तावें, तें खोटें होणार नाही. शेंडे महाराजांच्या पात्रामुळे निर्माण झालेली रहस्यमय गूढता व तज्जन्य कथासूत्रांतील तुटकता यामुळें या कादंबरीला थोडेसें गालबोट लागलें आहे असें वाटतें ! काळाच्या ओघांत बदलत्या ग्रामीण जीवनाचीं जीं कांही वैशिष्ट्यें या कादंबरींतून मधून मधून तरळून जातात त्या वैशिष्ट्यांवर जर दृष्टि पूर्ण केंद्रित केली असती तर कादंबरी आहे याहूनहि अधिक कलात्मक व जीवनदर्शी झाली असती असें मला वाटतें. कादंबरीला श्री. खांडेकर यांची प्रस्तावना व सौ. कुसुमावतीबाईंचा पुरस्कार लाभलेला आहे. स्वतः लेखकाचें व्यक्तित्व कळून येण्यास त्यांचें 'आत्मनिवेदन' उपकारक होईल.

प्रस्तुत कादंबरीचें कथानक भंडारा, आंभोरा, कोरंबी या गावांभोंवतीं विणलेलें असल्याने कादंबरींत एक प्रकारचें प्रादेशिक वातावरण निर्माण होतें. सामान्यतः वैदर्भीय प्रादेशिक वातावरण मराठी कादंबरींत आढळून येतच नाही; त्या दृष्टीनें श्री. शेंडे यांचा प्रस्तुत उपक्रम अभिनंदनीय वाटतो. नागपुरी बोलीचा सढळ वापर या प्रादेशिक वातावरणनिर्मितीच्या दृष्टीनें उपकारक झाला असून ही बोली हेंहि कादंबरीचें एक महत्त्वाचें वैशिष्ट्यच मानावें लागेल.

मानवी मूल्यांवरील गाढ श्रद्धा व्यक्त करणारी कादंबरी लिहून आपलें वैशिष्ट्य या प्रांगणांतहि कायम राखलें याबद्दल लेखकाचें अभिनंदन करतों.

—व. कृ. व.

बनहट्टी लेखसंग्रह २ :

नाट्य व रंगभूमी

[ले०—प्रा. श्री. ना. बनहट्टी; प्र. त्र्यं. गो. देशमुख, नागपूर; मूल्य रु. ३; पृ. २०५]

महाराष्ट्रांतील नामवंत विद्वान व नाट्यकलेचे अत्यंत जिव्हाळ्याचे पण चिकित्सक रसिक प्रा. श्री. ना. बनहट्टी यांच्या नाट्य व रंगभूमिविषयक अनेक नैमित्तिक लेखांचा व भाषणांचा हा संग्रह आहे. प्रा. बनहट्टी यांची गाढ विद्वत्ता, प्रदीर्घ व्यासंग व अभिजात रसिकता यांची महाराष्ट्राला नव्याने ओळख

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

करून देण्याची आवश्यकता नाही. वस्तुतः सदासर्वदा गंभीर विचारांनी भारावलेला दिसणारा त्यांचा चेहरा व विलक्षण अबोल वृत्ति लक्षांत घेतल्यावर निदान नागपुराबाहेरील नाट्यरसिक हा असा अति-सज्जन माणूस मराठी रंगभूमीचा जिव्हाळ्याचा उपासक असूं शकतो, यावर सहजासहजीं विश्वास ठेवायला तयार होणार नाही. परंतु मराठी रंगभूमीच्या अवनतीला गेल्या २४ वर्षांपासून सुरवात झाल्यानंतर तिच्या पुनरुज्जीवनाकरिता प्रा. बनहट्टी यांनी अखिल महाराष्ट्रांत व विशेषतः नागपूर शहरांत केलेली कष्टपूर्ण व रचनात्मक कामगिरी केवळ असामान्य आहे यांत शंका नाही. इतकेंच नव्हे, तर त्यांच्या प्रयत्नांमुळेच मरूं घातलेली महाराष्ट्राची नाट्यकला पूर्वीच्याच वैभवानें व नव्या दीप्तीनें तळपूं शकते हा दुर्दम्य आत्मविश्वास आज सर्वत्र निर्माण झालेला आहे.

प्रस्तुत संग्रहांतील पहिला लेख 'नाटिका व भावबंधन' निव्वळ समालोचनात्मक आहे. केवळ साहित्यिक टीकाकाराच्या भूमिकेवरून प्रा. बनहट्टींनी या दोन नाटकांचें मूल्यांकन केलेलें असलें तरी त्यांत त्यांच्या नाट्य व रंगभूमिविषयक अपेक्षा व ध्येय यांचा अस्फुट परिचय झाल्याशिवाय राहात नाही. त्यांच्या इतर लेखांमध्ये मात्र नाट्य व रंगभूमि या संबंधीच्या अनेकविध प्रश्नांची मौलिक व अधिकारपूर्ण चर्चा केलेली आहे. 'नाट्यवाङ्मयांतील नवे प्रवाह' या लेखांत पाश्चात्य देशांतील विचार-क्रांति व सांस्कृतिक खळबळ, त्याचप्रमाणे आमच्या समाज-जीवनांत द्रुतगतीनें होणारे बदल यांचा परिणाम मराठी नाट्यवाङ्मयावर कसा घडून आला याचें अत्यंत तर्कशुद्ध व सडेतोड विवेचन केलेलें आहे. 'नाट्यकलेचा नवोदय' ही लेखमाला तर फारच उद्बोधक व मननीय आहे. मराठी रंगभूमीचा झालेला अपकर्ष पाहून प्रा. बनहट्टींच्या सहृदय रसिक मनाला वाटणारा सात्त्विक संताप जितका त्यांत व्यक्त झालेला आहे, तितकाच किंबहुना त्याहिपेक्षा जास्त, तिच्या उज्ज्वल भवितव्याविषयीचा त्यांचा गाढ आत्मविश्वासहि प्रतिबिंबित झालेला आहे. खालावलेल्या नाट्यकलेला उचलून धरण्याकरिता इंग्लंड, अमेरिका, रशिया, जर्मनी इत्यादि पाश्चात्य देशांत कोणकोणते यशस्वी प्रयत्न करण्यांत आलेत यांचें तुलनात्मक विवेचन करून 'लघुनाट्य' तथा 'रेपर्टरी' चळवळीमुळे त्या देशांत नाट्यकला नव्या दमानें कशी टिकून राहूं शकली, हें ऐतिहासिक सत्याच्या आधारावर सिद्ध केलेलें आहे. आणि रंगभूमीच्या पुनरुज्जीवनाचा तो दाखला समोर ठेऊन "सध्याच्या काळांत बदललेल्या परिस्थितीस अनुसरून रंगभूमीचा व्यवहार बदलला पाहिजे; निराळ्या प्रकारच्या लोकांनी निराळ्या तत्त्वानुसार तो चालविला पाहिजे" हा यथार्थ एवं रचनात्मक उपाय त्यांनी महाराष्ट्र रंगभूमीच्या उत्कर्षाकरिता सुचविलेला आहे. तसें केलें म्हणजे "रंगभूमीचा उत्कर्ष लांब नाही" असा प्रा. बनहट्टींचा आत्मविश्वास आहे. नाशिकच्या सार्वजनिक वाचनालयांत इ. स. १९४१ सालीं त्यांनी दिलेलें 'नाट्यवाङ्मय व त्याचा विकास' या विषयावरील भाषण व्यासंगपूर्ण आहे. मराठी रंगभूमि व नाट्य यांच्या विकासाचा संक्षेपानें पण अधिकृत परिचय करून घेऊं इच्छिणाऱ्या रसिकांना व विद्यार्थ्यांना हा लेख निःसंशय मार्गदर्शक होईल. इंदूरच्या नाट्य-शताब्दीनिमित्त केलेल्या अध्यक्षीय भाषणांत प्राध्यापकमहाशयांनी भारतांतील इतर—बंगाली, गुजराथी, उर्दू आदि रंगभूमींचा ऐतिहासिक व तुलनात्मक आढावा घेऊन, "अभिनय किंवा भावानुकृति ही भावविमोचनाची व आत्म आविष्काराची श्रेष्ठ प्रतीची मानसिक प्रक्रिया आहे" आणि म्हणून "प्राथमिक शाळांपासून तों विद्यापीठांतील अभ्यासक्रमापर्यंत शिक्षणाच्या सर्व टप्प्यांमध्ये नाट्यकलेला मानाचें स्थान" द्यावयास पाहिजे अशी जोरदार शिफारस केलेली आहे. नागपुरांतील 'अभिनव नाट्यमंदिर' व 'अकॅडेमी ऑफ ड्रॅमॅटिक आर्ट' या संस्थांच्या माध्यमानें प्रा. बनहट्टींनी या दिशेने केलेले जिवापाड कष्ट लक्षांत घेतां या विषयासंबंधीची त्यांची कळकळ किती क्रियात्मक आहे याचें सहज प्रत्यंतर येऊं शकेल. 'मौनव्रताचें पारणें' या लेखांत नटवर्य श्री. केशवराव दाते यांच्या एका लेखाला उत्तर देत असतांना सध्याच्या लोकसत्ताक सरकारच्या कृतिमान सहकार्याची महापर्वणी आळश्यावरून जाणाऱ्या गंगेप्रमाणें फुकट व जाऊं,

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

देण्याची विनंती नटवर्यांना करून "रंगभूमीच्या संवर्धनाचे आपले बेत कृतिरूपाने अमलांत आणण्यास" अतिशय स्नेहानें आवाहन केलेलें आहे. 'नाटचाचा विकास व विस्तार' या स्वागताध्यक्षीय भाषणांत अलिकडच्या काळांतील श्री. के. नारायण काळे पुरस्कृत नाटच–वाचन, रेडियो–नाटच आदि नाटचाच्या विविध आविष्कारांची चर्चा केलेली असून त्यामुळे "नाटचाला अधिकच व्यापक आणि विविध स्वरूप प्राप्त" झालें आहे असें प्राध्यापकांना वाटतें. या बाबतींत अनेकांचा मतभेद होण्याचा संभव असला, तरी श्री. बनहट्टींनी केलेली चर्चा समतोल व तर्कशुद्ध आहे यांत शंका नाही. 'एकांकिका आणि नवनाटच' हा प्रस्तावना-लेख चिकित्सक व मराठी भाषेंतील अलिकडच्या या नवीन नाटच-प्रकाराच्या तंत्राचा सांगोपांग परिचय करून देणारा आहे.

सारांश, मराठी रंगभूमि व नाटच यांच्या प्रत्येक अंग-उपांगांचा सांगोपांग व आस्थापूर्वक विचार प्रा. बनहट्टींनी प्रस्तुत लेखसंग्रहांत केलेला आहे. त्यांची गाढ विद्वत्ता, समतोल पण चिकित्सक विचारसरणी व सर्वस्पर्शी अनुभव यांमुळें त्यांच्या भाषेला व विचारांना विलक्षण धार आलेली आहे. त्यामुळे हा लेखसंग्रह मराठी रंगभूमीच्या आस्थेवाईक व जिज्ञासू अभ्यासकांना निश्चित मौल्यवान वाटेल यांत शंका नाही.

फक्त एकच गोष्ट आणखी लिहावीशी वाटते व ती म्हणजे प्रस्तावनेसंबंधी. प्राध्यापक बनहट्टी म्हणतात त्याप्रमाणे "मूळ ग्रंथाबरोबरच प्रस्तावनेकडेहि आपली काटेकोर नजर वळविणाऱ्या" टीकाकाराचा दोष पत्करून असें म्हणावेसें वाटतें की श्री. द. रा. गोमकाळे यांना आपल्या प्रस्तावनेंतील 'कटु' तपशिलाचा भाग सहज गाळतां आला असता व त्याशिवाय देखील त्यांची प्रस्तावना खुलून दिसूं शकली असती. श्री. गोमकाळे प्रा. बनहट्टींचे निष्ठावंत व सुयोग्य शिष्य आहेत. आपल्या गुरूच्या सांनिध्यांत दीर्घकाळपर्यंत व्यासंग करण्याचें भाग्य त्यांना लाभलेलें आहे. त्यामुळें आपल्या गुरूच्या कांही प्रासंगिक मानभंगाबद्दल त्यांना सात्विक त्वेष वाटणें स्वाभाविक आहे. पण तो व्यक्त करण्याचें हें उचित स्थान नव्हतें, हें मात्र खास. महाराष्ट्र साहित्यक्षेत्रांत शेकडो एकलव्य प्रा. बनहट्टींना गुरुस्थानीं मानतात हें त्यांनी विसरतां कामा नये. त्यांच्यासारख्या अनासक्त व स्थितप्रज्ञ सज्जनाच्या लेखसंग्रहाला असलेल्या प्रस्तावनेंत तथाकथित विरोधकांच्या अथवा निंदकांच्या अयोग्य कारवायांचा अप्रस्तुत उल्लेख असणें खचित भूषणास्पद नाही.

—ग. म. क्षुं.

झुंजार शनि

[ले०——पद्माकर जोशी, प्र० प. का. जोशी, २९१ जोशी बिल्डिंग, भुसावळ. मू. १॥ रु. पृ० ६४.]

शनि ग्रहच झुंजार ग्रह कां आहे? राशिचक्र आणि राशींचे गुणधर्म; राशीवर होणारे शनीचे परिणाम; शनीचे शत्रुग्रह, शनीमुळे होणारा संपत्ति योग; शनीचा त्रिरेकादशयोग: स्थित शनीचा प्रभाव, द्रेष्काण आणि त्याचे स्वामी, ग्रहगतीचा काल, निरनिराळ्या नक्षत्रांत असण्याचीं फलें, शनीची साडेसाती आणि तिची शांति वगैरेची माहिती या पुस्तकांत निरनिराळ्या लोकांच्या, मोठमोठ्या व्यापाऱ्यांच्या, राजकीय प्रमुख प्रमुख पुढाऱ्यांच्या, जगांतील विद्वान आणि वंदनीय व्यक्तींच्या, नटनटींच्या कलावंतांच्या आणि राजेमहाराजे यांच्या कुंडलींतील शनीचीं उदाहरणें देऊन दिली आहे. तसेंच पुस्तकाचे शेवटीं "पुनर्जन्म आहे कां?" याचाहि विचार या पुस्तकांत गुरु आणि शनि यांच्या भावावरून केला आहे.

या पुस्तकांत दिलेली बरीचशी माहिती ही शास्त्रीय आधार नसलेली, भ्रामक आणि कांही ठिकाणीं तर चुकीचीहि आहे. उदाहरणार्थ पान १२ वर लग्नराशीची पुढीलप्रमाणे माहिती दिली आहे. "लग्नराशी म्हणजे तुमच्या जन्माच्या वेळची आकाशांत बरोबर डोक्यावर असणारी राशि." ही व्याख्या चुकीची आहे. डोक्यावर असणारी राशि ही त्रिभोनलग्नाची राशि असते. लग्नराशि नसते. खस्वस्तिक बिंदु हा दशमभाव होय. लग्नबिंदु नव्हे. तसेंच पान ५३ वरील कोष्टकांत रवीचा राशिचक्रांतील परिभ्रमणकाल १९ वर्षे दिला असून, चंद्राचा ४ वर्षे, बुधाचा

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

१० वर्षे आणि शुक्राचा ८ वर्षे दिला आहे. या पुस्तकांतील ह्या माहितीवरून पुस्तककर्त्याचें या विषयाचें पूर्ण अज्ञानच दर्शवितें.

भविष्य–बोधिनी

[ले०––पद्माकर जोशी, प्र. सौ. माधवी वसंत कुळकर्णी, मालोदकर बिल्डिंग, भुसावळ, मू.३ रु. पृ० १०४.]

यांत भविष्यकथनास लागणाऱ्या मूलभूत गोष्टींची माहिती दिलेली आहे. या पुस्तकांत द्वादशभावदर्शन, कुंडलीची बैठक, ग्रहांच्या दृष्टि, स्थानबली म्हणजे काय ? फलादेशाचे कांही अनुभविक सिद्धांत, रवि, चंद्र, मंगळ, बुध, गुरु, शुक्र, शनि, राहु आणि केतु या ग्रहांची ओळख, दशापद्धतीचा शोध व महति, कुंडलीचा बोध, संख्याशास्त्र, ग्रहांचे शत्रु–मित्र कोष्टक, ग्रहांची उपासना या विषयावर विवेचन आणि विचार केला आहे.

या पुस्तकांत संख्याशास्त्राचें विवरण विस्तृतपणें केलेलें आहे. यांतील विवेचन बऱ्याचशा मोठमोठ्या लोकांच्या कुंडलींतील ग्रहांचीं उदाहरणें देऊन केलेलें असल्यामुळे हें एक प्रकरण या पुस्तकांत चांगलें वठलें आहे.

यांहि पुस्तकांतील बरीचशी माहिती भ्रामक आणि चुकीची आहे. यामुळे असलीं पुस्तकें प्रसिद्ध न होतील तर बरें असें म्हणण्याची दुर्दैवाने पाळी आली आहे. उदाहरणार्थ पान ९ व १० वरील दिलेली ग्रहांच्या गतीसंबंधीची माहिती पाहा. "ग्रहांच्या गतीचे चार प्रकार आहेत. शीघ्रगति, मध्यमगति, मंदगति आणि वक्रगति. शीघ्रगति ग्रह आपल्या रेषेवरून नेमलेल्या गतीने गमन करतो. मध्यगति व मंदगति ग्रह सूर्यसंनिध असतो." यावरून या विषयासंबंधीचें पुस्तकलेखकाचें अज्ञान किती अगाध आहे हें सामान्य वाचकांसहि दिसून येईल. पुढे याच पानावर "(१) सूर्य हा सूर्योदयापासून पुन्हा दुसरे दिवशीचा सूर्योदय होईपर्यंत १२ हि लग्नें फिरून एक अंश एका दिवसांत फिरतो. (२) चंद्र हा ४३ घटकेंत १२ हि लग्नें एका अंशाची फिरून याच क्रमाने दोन दिवस १५ घटकेंत एकी राशीचे ३० अंश फिरतो" याचप्रमाणें सर्व ग्रहांची माहिती दिलेली आहे. कोणताहि ग्रह २४ तासांत १२ लग्नें फिरत नाही, हें सामान्य ज्ञानहि पुस्तक लेखकाला दिसत नाही. पृथ्वीच्या दैनंदिन गतीमुळे प्रत्येक ग्रह २४ तासांत १२ भावांतून जातो, १२ लग्नांतून जात नाही. हें न समजण्याचें कारण लेखकाला लग्न म्हणजें काय हेंच माहिती नाही असें असावें. लग्नाची व्याख्या अशी आहे की, क्षितिजवृत्त आणि क्रांतिवृत्त यांच्या पूर्वेकडील छेदनबिंदूला लग्न असें म्हणतात. तेव्हा असलीं पुस्तकें लिहून लोकांत अज्ञानाचा प्रसार करूं नये ही माझी लेखकास नम्र विनंति आहे.

––गं. रा. दे.

मुक्त–मयूराचीं भारतें

[श्रीमद्व्यास, मुक्तेश्वर आणि मोरोपंत यांच्या भारतांचा तौलनिक अभ्यास–ले. डॉ. ना. गो. नांदापूरकर, एम्. ए., पी. एच. डी. प्र. रा. ब. माढेकर, अध्यक्ष मराठवाडा साहित्य परिषद, इसामिया बाजार, हैदराबाद मूल्य. रु. १५, पृ. ७९६]

मराठींत अलिकडे प्रसिद्ध झालेल्या चिकित्सक आणि अभ्यासपूर्ण ग्रंथांत प्रस्तुत ग्रंथ अग्रभागीं शोभण्यासारखा आहे. 'प्रदीर्घ व्यासंग, मौलिक दृष्टिकोन, मूलग्राही विवेचन, साक्षेपी संशोधन आणि शास्त्रशुद्ध मांडणी या सर्व दृष्टींनी या ग्रंथाचें महत्त्व आहे' असें आपल्या निवेदनांत प्रकाशक म्हणतात तें अगदी यथार्थ आहे. नागपूर विद्यापीठाने या प्रबंधावर संतुष्ट होऊन कर्त्यास पीएच. डी. या पदवीने भूषविलें हेंहि फार समुचित झालें.

प्रस्तुत ग्रंथांत पुढीलप्रमाणे एकूण तेरा उन्मेष आहेत (१) प्रबंधाच्या अभ्यासाची दिशा (२) कथानक (३) आख्यानोपाख्यानें (४) व्यक्तिदर्शन (५) संक्षेप विस्तार (६) भूमिका (७) भाषांतर की स्वतंत्र (८) भारतत्रयांतील रसवत्ता (९) अलंकार आणि भावनाविलास (१०) मुक्त मयूराची भाषाशैली (११) सामाजिक परिस्थिति (१२) मुक्तेश्वर आणि इतर

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

प्रश्न (१३) उपसंहार. या विभागणीवरून ग्रंथाच्या व्यापाची व विशालतेची कल्पना येईल.

रामायण महाभारतादि प्राचीन ग्रंथांच्या आधारें अनेक मराठी कवींनी आपापल्या पद्धतीप्रमाणे रचना केली. त्यांत मुक्तेश्वर व मोरोपंत हे अग्रगण्य होत. हे कवि केवळ भाषांतरे आहेत की यांची प्रज्ञा आणि प्रतिभा स्वतंत्र होती यासंबंधी अव्वल इंग्रजींत पुष्कळ वाद झाले. चिपळूणकरांनी निबंधमालेंत 'मोरोपंताची कविता' या आपल्या ग्रंथांत यासंबंधी साधक बाधक विवेचन करून पंत भाषांतरे नव्हते असा आपला निर्णय दिला आहे. प्रा. बनहट्टी यांनीहि आपल्या 'मयूरकाव्य-विवेचन' या अप्रतिम उत्तम ग्रंथांत भागवती काला-पुरता विचार करून मुक्तेश्वर मयूरकवि भाषांतरे नव्हते असें सिद्ध केलें आहे. परंतु मुक्तेश्वरी महाभार-ताचीं उपलब्ध चार पर्वें, तींच मोरोपंती महाभारताचीं पर्वें व तोच मुळांतील मजकूर यांची परस्पर तुलना तपशीलानें करून हा सिद्धान्त पटवून देण्याइतका ब्रहद्ग्रंथ आतापर्यंत झालाच नव्हता. त्या दृष्टीने या ग्रंथाचें मूल्य फार मोठें आहे.

लेखकांनी आपल्या प्रस्तावनेंत पुढीलप्रमाणे या ग्रंथाची भूमिका विषद केली आहे—

'मुळांतील विषय मुक्त मयूराची तुलना, पण त्यांचीं भारतें संस्कृत भारतावर अधिष्ठित, यास्तव त्या अभ्यासाचा यांत सबंध आला. पण तो इतका घनिष्ठ ठरला की या परस्परांची तुलना करतां करतांच त्यांची संस्कृत भारताशींहि अगदी खडान्खडा तुलना करावी लागली.

'प्रस्तुत विषयाचा असा अभ्यास आजपर्यंत झालाच नाही. यांत आपल्या आणि पाश्चात्य अशा दोन्ही साहित्यशास्त्रांची दृष्टि योजून सरणी आखली आहे. रस, अलंकार यांचा निकष औचित्याच्या विचा-रासह तर लावलाच; पण कथानकाची रचना, स्वभा-वपरिपोष भाषाशैलींतील इतर गोष्टी यांचाहि विचार केला. कथानकांतील तिघांचेंहि रचनाकौशल्य पाहून मराठी कवींच्या रचनेवर तत्कालीन सामाजिक परि-णाम काय घडला तें दर्शविलें. काव्याकडे समाज-सापक्षेतेनें पाहण्याची जी आधुनिक प्रणालि तिचाहि विचार केला आणि मराठी कर्त्रीचें स्वातंत्र्य किती हें दाखविलें. प्रस्तुत प्रबंधांत क्षुल्लक प्रसंग त्रोटकपणें विवेचिले असले तरी वगळला मात्र एकहि नाही. पूर्व विद्वानांनी केलेला अभ्यास एखाद्या विशिष्ट प्रसंगाचा असून सबंध भारताचा तुलनात्मक विचार हा पहिलाच आहे. स्वभाव प्रकरणांतहि भारतांतील कांही पात्रांचा विद्वानांनी प्रसंगपरत्वें विचार केला आहे. पण धर्मादि-कांच्या स्वभावाचा विकास सबंध भारतभर कसा झाला ह्याचा तिघांच्याहि तुलनेने अद्यापपावेतो कुणीहि अभ्यास केला नाही. प्रस्तुत प्रबंधांत तो प्रथमच करण्यांत आला आहे.' इ.

या भूमिकेचें परिपालन या ग्रंथांत इतक्या कसो-शीने व प्रामाणिकपणे केलें आहे की त्यास इतरत्र क्वचितच तोड सापडेल. व्यास, मुक्तेश्वर व मोरोपंत यांची ओळ न् ओळ तुलनात्मक पद्धतीने वाचून त्यांचा सर्वांगांनी विस्तृत विचार हें फार मोठ्या परिश्रमाचें काम आहे. सध्या मूळ ग्रंथांतील कांही भागाचा संक्षेप करून व कांही भाग वगळून तो मुद्रित करण्यांत आला असून त्याचींच डेमी आकाराचीं बारीक टाइपांत ७५६ पृष्ठें झालीं आहेत. पूर्ण ग्रंथ छापला असता तर सुमारें दीड हजार पृष्ठें झालीं असतीं, यावरून ज्ञानकोश-स्वरूप असलेल्या या ग्रंथाची कल्पना येईल.

'अशा प्रकारें प्रस्तुत प्रबंधामध्ये प्रमाणें देऊन, काव्यसौंदर्य दर्शवीत, तौलनिक पद्धतीने जो अभ्यास केला त्यांत मुक्त मयूराचीं भारतें स्वतंत्र आहेत ही गोष्ट निदर्शनास आली. त्याचप्रमाणे मुक्तेश्वर आणि मोरोपंत हे दोघेहि मराठी वाङ्मयांतील अत्यंत श्रेष्ठ कवि असून एकंदर गुणसमुच्चयाच्या मानाने मोरो-पंतांचें काव्य मुक्तेश्वरांच्या काव्यापेक्षा अधिक सरस आणि प्रसन्नकर आढळून आलें'

हा संपूर्ण ग्रंथाचा निष्कर्ष आहे. तो सर्वांना मान्य होईल यांत आम्हांला शंका वाटत नाही. यांतील प्रत्येक विधान पुराव्याने सिद्ध केलेलें असल्यामुळं तें खोडून टाकणें अगदी अशक्य आहे. सर्वत्र वस्तुस्थितीच वर्णन केली आहे, त्यामुळे ती मानण्याखेरीज गत्यंतरच

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

नाही. शेवटच्या तीन उन्मेषांत मुख्यतः निष्कर्षरूप विवेचन असल्यामुळें तो मजकूर जास्त महत्त्वाचा आहे. ग्रंथकर्त्यांनी मुक्त-ययूराचीं भारतें असें आपल्या ग्रंथास नांव दिलें आहे. यांतील मुक्त-मयूर हा द्वंद्व समास खराच, पण मुक्त असा मयूर असा कर्मधारय समासहि तो घेण्यास हरकत नाही, अशा सहेतुकतेनेच ही संज्ञा लेखकांनी वापरली असावी असें आम्हांस वाटतें.

हा केवळ ग्रंथपरिचय आहे. परीक्षण नव्हे. कारण परीक्षण करण्यासाठी यांत दोष शोधूनहि सापडण्यासारखे नाहीत. क्वचित् कांही तपशिलांतील निष्कर्षांबद्दल कोणाचा मतभेद होऊं शकेल, पण मुख्य प्रमेयाबद्दल आता कोणी वाद घालील असें वाटत नाही.

डॉ. नांदापूरकर यांनी स्वाध्यायाचें जें उदाहरण घालून दिलें तें अनुकरणीय आहे. डॉ. शं. दा. पेंडसे यांचा 'आशीर्वाद' औचित्यपूर्ण आहे.

—पां. कृ. सा.

मराठी महाभारताचें स्वातंत्र्य

[ले. डॉ. ना. गो. नांदापूरकर. प्र. मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालय मुंबई, मूल्य रु. १]

मुंबईच्या मराठी ग्रंथसंग्रहालयाच्या १९५५ च्या वार्षिकोत्सव प्रसंगीं मुख्य वक्ते म्हणून डॉ. नांदापूरकर यांनी जें भाषण केलें तें प्रस्तुत लहानशा पुस्तिकेंत प्रसिद्ध केलें आहे. डॉ. नांदापूरकरांनी 'मुक्त-मयूराचीं भारतें' या आपल्या ग्रंथांत मांडलेला सिद्धान्तच प्रस्तुत व्याख्यानांत संक्षेपानें मांडला आहे. अर्थात् हें लहानसें पुस्तक वाचलें तरी डॉ. नांदापूरकरांचा मोठा ग्रंथ सिद्धान्तरूपानें वाचल्याचें श्रेय मिळूं शकेल.

ज्ञानेश्वरीच्या ओव्या—'बारा पराग' मधील. [लें० व प्र. स. र. पंतसचिव मूल्य २ आणे.] प्रस्तुत चाळीस ओव्यांच्या पुस्तिकेंत ज्ञानेश्वरी ओवीची प्रशस्ति केली असून त्यांत ज्ञानेश्वरींतील अनेक संदर्भ आले आहेत. रचना बहुश्रुतपणाची व भक्तीची द्योतक आहे.

सोपा विश्वधर्म--[लें० लक्ष्मण रघुनाथ कुळकर्णी, भातृभाव मंडळ, घोडबंदर रोड, गोरेगाव (मुंबई) पृ. ३२. मूल्य आठ आणे.]

हिंदुधर्माच्या वैश्विक स्वरूपाचें मोठें भावपूर्ण व अनुभवग्राही वर्णन या पुस्तिकेंत केलें असून तें अतिशय वाचनीय व उपयुक्त झालें आहे.

उपनिषदांतील कथा

[लें०—म. बा. कुळकर्णी, प्रकाशक-वि. वि. दामले, हिंदुस्थान साहित्य. ३६४, न. चिं. केळकर रस्ता, दादर, मुंबई २०. मू. १॥ रु.]

वैदिक वाङ्मयांत मंत्र, ब्राह्मण व उपनिषदें अन्तर्भूत आहेत. मंत्र हे पद्यरूप व काव्यमय स्तवनें आहेत. तर ब्राह्मण ग्रंथ हे यज्ञयागादि कर्मकाण्डांचे विवरणस्वरूप व म्हणूनच गद्यमय आहेत. त्या उलट उपनिषदें हीं चिंतनप्रधान व तत्वज्ञानात्मक असून गद्यपद्यमय दोन्हीं आहेत. वैदिक ऋषींच्या आध्यात्मिक अनुभवाचें सार सरळ-सुबोध भाषेंत तसेंच उद्बोधक आणि समर्पक दृष्टांतादींनी स्पष्ट केलेलें उपनिषदांत ग्रथित केलें आहे. त्यांतील कांही कथा निव्वळ भाषांतर म्हणून नव्हेत तर मुद्दा स्पष्ट करण्याच्या दृष्टीनें सविस्तर रीतीनें श्री. म. बा. कुळकर्णी ह्यांनी मराठींत पुनः लिहिल्या आहेत. त्या प्रथम 'विवेक' साप्ताहिकांत प्रसिद्ध झाल्या होत्या. आता पुस्तक रूपानें प्रकाशांत येत आहेत. कथा वाचनीय व परिणामकारी साधल्या आहेत. तरी पण मुळांतील अकृत्रिम गोडी त्यांत दिसून येत नाही. कांही चित्रेंहि पुस्तकांत घातलीं आहेत. छपाई साधारण बरी असली तरी अक्षम्य चुका सर्वत्र राहिल्या आहेत. पुरस्कारांतील एकमेव संस्कृत उतारा चुकीचा छापला गेला आहे. तोच पुस्तकाच्या मागील पृष्ठभागावर पुन्हा तसाच चुकीचा छापला आहे. तो 'यो वै भूमा तदमृतम्। नाल्पे सुखमस्ति।' असा असायला हवा.

—दि. वि. व.

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

दीपावलि विशेषांक

हिंदुस्थान--विचारप्रवर्तक व वाङ्मयीन निबंध आणि लघुकथा इत्यादि साहित्याने हा सजला आहे. 'काश्मीरचा महान दार्शनिक' हा वाङ्मयीन निबंध उत्कृष्ट आहे.

संदेश--हिंदी मराठी मासिक. हें 'अखिल क्षत्रिय कलार समाजा'चें असल्यामुळे त्यांत त्यांच्या समाजाच्या उन्नतीचा जास्त विचार केला आहे.

श्रीसरस्वती--'आमचें द्विभाषिक राज्य' आणि 'विद्यार्थी व राजकारण' या दोन विषयांवरील परिसंवाद, 'आमच्या वाङ्मयीन संस्थांचें पुढे काय व्हावयाचें ?' आणि 'आधुनिक स्त्रिया अधिक अनीतिमान् आहेत काय ?' हे लेख उल्लेखनीय आहेत. अवशिष्ट साहित्य ठरीव साच्याचें आहे.

वाग्वीणा--अंकांतील साहित्य वाचनीय आहे. हें मासिक मुख्यत: स्त्रियांनी चालविलें आहे ही गोष्ट उल्लेखनीय आहे.

संजय-- माहितीपूर्ण व संकलनात्मक स्वरूपाचा अंक आहे. 'मालविकाग्निमित्रम्' नाटकाची व छायाचित्रांच्या साहाय्यानें सांगितलेली 'स्वप्न-भारती' कथा विशेष उल्लेखनीय आहे. 'शंबूका'चा परिचय मुळांतल्यापेक्षा पुष्कळच भिन्न रीतीनें करून दिलेला आहे.

नवल--नवीन ज्ञान मनोरंजक रीतीने सांगणारे माहितीपूर्ण लेख पुष्कळ आहेत. भास कवीच्या 'ऊरुभंग' या नाटकाचा परिचय उत्कृष्ट आहे. 'माझे अध्यक्षपदाचे अनुभव' यांतील अध्यक्षांचे अनुभव मनोरंजक व भिन्नभिन्न व्यक्तींच्या स्वभावाचे बारकावे सांगणारे आहेत.

राष्ट्रशक्ति--अंक अंतर्बाह्य उत्कृष्ट आहे. सर्वच लेख विचारपरिप्लुत आहेत.

महाराष्ट्र--(संपादक--पुरुषोत्तम दिवाकर ढवळे; महाराष्ट्र छापखाना, नागपूर; पृ. १२०; किंमत १ा. रु.) महाराष्ट्र हें नागपूरचें एक अग्रगण्य मराठी दैनिक आहे. आपल्या कीर्तीस साजेसाच हा दिवाळी अंक निघाला आहे. विवेचनात्मक व ललित लेख, कविता आणि वर्षभविष्य यांनी हा अंक नटला आहे. श्री. बाळशास्त्री हरदास, श्री. पु. य. देशपांडे इ० लेखकांचे लेख मननीय आहेत. मुखपृष्ठाची सजावटहि आकर्षक आहे.

सह्याद्रि--(संपादक-दि. वि. काळे; ५६८ नारायण, पुणें २, पृ. १६६+४; कि. १॥ रु.) सह्यादि हें महाराष्ट्रांतील एक प्रतिष्ठासंपन्न मासिक आहे. ह्या प्रतिष्ठेला अनुरूप असाच प्रस्तुत दिवाळी अंक आहे. श्री. ज. स. करंदीकर, श्री. व. शां. देसाई, श्री. वि. दा. सावरकर इ. लेखकांचे लेख महत्वाचे आहेत. ह्याशिवाय लघुकथा, विनोदी वाङ्मय, कविता व अन्य ललित साहित्य यांनी प्रस्तुत अंकाच्या वाचनीयतेंत भर घातली आहे. अंकामध्ये व्यक्तिचित्रांची व व्यंगचित्रांची रचना आकर्षक आहे.

नवभारत--(का० संपादक--प्रा. गोवर्धन पारीख; ४४६ शीव रोड, मंबई १९; पृ. १६६+८; कि. २ रु.) 'भाषा, संस्कृति व राज्य विशेषांक' ह्या नांवाखाली दिवाळीचे सुमारास हा नवभारताचा अंक निघाला आहे. राज्यपुनर्घटनेच्या काळांत प्रस्तुत विषय निवडून नवभारताने औचित्य दाखविलें आहे. सर्वच लेख विवेचक, अभ्यासपूर्ण व प्रथितयश लेखकांनी लिहिलेले आहेत. संपूर्ण अंक केवळ वाचनीयच नव्हे, तर अभ्यसनीयहि आहे.

'श्री गुरुदेव'

मानवसमाजाच्या सर्वांगीण उन्नतीस वाहिलेलें मासिक

श्री गुरुदेव प्रकाशन, गुरुकुंज, मोझरी

हिंदी-मराठी विभागात्मक वा. मूल्य रु. ५]

हिंदी विभागात्मक [वा. मूल्य रु. ३

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

सुषमा—(संपादक—कुंडलराय मोहेकर; धरमपेठ, नागपूर; पृ. १३६+१०; किं. १॥ रु.) ललित साहित्याने सुषमेचा दिवाळी अंक पूर्णपणें विनटला आहे. तामीळ व बंगाली ह्या आंतरभारती कथा, रशियन, हंगेरियन व चिनी ह्या आंतरराष्ट्रीय कथा आणि ७२ पानी कादंबरी हे ह्या अंकाचे विशेष होत.

मौज—(संपादक—वि. पु. भागवत; खटाववाडी, मुंबई ४; पृ. १७८+४; किं. २॥ रु.) विविध प्रकारच्या ललित साहित्याची चमचचमीत मेजवानी प्रस्तुत अंकाच्या वाचनाने मिळते. कलापूर्ण मुखपृष्ठ, आकर्षक छायाचित्रें, सुबक छपाई व व्यंगचित्रें, यांनी अंक आकर्षक झाला आहे.

साधना—(संपादक—य. द. थत्ते; ३७४; शनवारपेठ, पुणें २; पृ. १४४+४; किं. १॥ रु) सानेगुरुजींच्या अप्रकाशित साहित्यांतून घेतलेल्या 'स्वकर्म कुसुमें' ह्या लेखाने प्रस्तुत अंकांतील साहित्याला सुरुवात झाली आहे. कथा आणि काव्य यांना अंकांत प्राधान्य देण्यांत आलें आहे. लहान मुलांसाठी रोचक लेखहि ह्या अंकांत आहेत. मुखपृष्ठ व अंकाची सजावट यांत साधेपणा व सुबकता यांचा सुंदर संगम साधला आहे.

मराठवाड्यांतील एकमेव मराठी मासिक
मराठवाडा साहित्य परिषदेचें मुखपत्र

प्रतिष्ठान

दर महिन्याच्या १ तारखेस प्रसिद्ध होतें

समीक्षा, ललित, काव्य, संशोधन इत्यादि विषयांवरील मौलिक साहित्य

आजच वर्गणीदार व्हा

वार्षिक वर्गणी रु. ५ किरकोळ अंक ८ आ.

जाहिराती स्वीकारल्या जातात

मराठवाडयाबाहेर एजन्सी देणें आहे. लिहा.

"प्रतिष्ठान" कार्यालय,
इसामिया बाजार,
हैदराबाद-दक्षिण.

सत्यकथा—(संपादक--वि. पु. भागवत; खटाववाडी, मुंबई ४; पृ. ११६; किं. १॥ रु.) कथा, नाटिका, ललितलेख, कविता, कादंबरीचा अंश इ. ललित लिखाण प्रस्तुत अंकांत भरपूर आहे. श्री. मंगरुळकर यांचा एक विवेचक लेखहि आहे. मुखपृष्ठ कलापूर्ण असून अंकाची सजावटहि सुबक आहे.

केसरी—(संपादक--ज. श्री. टिळक, पुणें; पृ. २४; किं. ४ आणे) केसरीच्या नेहमींच्या आकाराचाच दिवाळी अंक काढला आहे. त्यामुळे त्याच्या स्वरूपांत विशेषांकाची आकर्षकता नाही. तथापि लेख मात्र उत्तम आहेत. प्रा. श्री. म. माटे, सौ. मालतीबाई वेडेकर व श्री. वि. स. खांडेकर यांचे ललित लेख आणि स्वा. वी. वि. दा. सावरकर, श्री. ग. वि. केतकर आणि श्री. कुन्हा यांचे विवेचनात्मक लेख यांनी ह्या अंकाचें अंतरंग उजळलें आहे.

—श्री. गो. का.

साभार स्वीकार

मराठीचा मोहोर--डॉ. नांदापूरकर

लहरी--र. गं. विद्वांस

बुद्ध दर्शन--वि. मा. खेरकर

भक्तीचा कल्पवृक्ष--भा. पं. बहिरट

युद्धकालीन कथा—भा. द. खेर

पेशवाईतील रत्नें--प. श्री. दीक्षित

वाटचाल—रा. भि. जोशी

गारंबीचा बापू-(द्वितीयावृत्ति)-श्री. ना. पेंडसे

माणसाच्या गोष्टी--अंबादास अग्निहोत्री

अमृतानुभवकौमुदी--ना. पै. पंडित

अर्वाचीन गद्याची पूर्वपीठिका—गं. बा. सरदार

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

विदर्भ साहित्य संघ, नाटचोत्सव १९५६

विदर्भ साहित्य संघ, सहकारी नाटचोत्सव समितीने आयोजित केलेल्या नाटचोत्सवाला दिनांक ६ डिसेंबर १९५६ रोजीं आरंभ व्हावयाचा होता. परंतु दुर्दैवाने त्याच दिवशीं दलितांचे पुढारी व भारताचे आधुनिक मनु डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या आकस्मिक मृत्यूचें वृत्त आलें. त्यामुळें निमंत्रितांच्या उपस्थितींत डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या अत्यंत दुःखद निधनाबद्दल वि. संघातर्फे दुखवटचाचा पुढील ठराव पास करून त्या दिवशींचा सर्वच कार्यक्रम स्थगित करण्यांत आला.

" स्वतंत्र भारताच्या घटनेचे निर्माते, भारताचे आधुनिक मनु, चतुरस्र बुद्धिमत्तेचे पंडित, व सामाजिक समतेचे धुरंधर पुढारी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या दुःखद निधनाने भारताची व विशेषतः दलित समाजाची अपरिमित व कधीहि भरून न निघणारी हानि झाली आहे. त्यांच्या या दुःखद निधनाबद्दल विदर्भ साहित्य संघ या सभेद्वारा आपला आत्यंतिक शोक व्यक्त करीत आहे. ईश्वर मृताच्या आत्म्याला शांति देवो."

× × ×

नाटचोत्सवाला सुरुवात दुसऱ्या दिवशीं म्हणजें दिनांक ७ डिसेंबर १९५६ शुक्रवार रोजीं सायंकाळीं ५॥ वाजतां सुरवात झाली.

सुरुवातीला पूजानृत्य होऊन नंतर नाटचदेवतेच्या स्तवनपर श्री. गोमकाळे विरचित खालील पद्यगायनानंतर कार्यक्रमाला सुरवात झाली.

अर्पुनि हें भाव सुमन,
तन, मन, धन जीवहि,
नाटचकले तव चरणीं ।

तव पदीं निष्ठा जगांत, दाऊनि बसवूं तुलाच,
सिंहासन अंतरांत, नाटचदेवते ! तुलाच ।
नृत नाटचें सजवुनी ही, जन सेवारत मूर्ति,
काव्यकला गुण स्फुरवी, तम नाशी, दे प्रकाश ।
अभिजन अवघे तुलाच, स्तविती तव गुणबलास,
तृषार्ता दे जीवनास, दिव्य भावना विलास ।

नाटचोत्सवाचे अध्यक्ष नटवर्य श्री. केशवराव दाते यांनी अध्यक्षस्थान मंडित केल्यावर सहकारी सचिव श्री. मनोहर खोलकुटे यांनी नाटचोत्सवाला आलेले संदेश वाचून दाखविले. त्यांत श्री. दत्तोपंत पोतदार, श्री. खांडेकर, श्री. बाबासाहेब खापर्डे, श्री. वामणगांवकर, मुंबई प्रांताचे मंत्रि, श्री. रांगणेकर इत्यादिकांकडून संदेश आले होते.

त्यानंतर नाटचोत्सवाचे प्रमुख सचिव श्री. द. रा. गोमकाळे यांनी आपलें निवेदन सादर केलें.

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

प्रमुख सचिव, श्री. द. रा. गोमकाळे यांनी केलेलें निवेदन

आजच्या आमच्या ह्या वि. सा. संघाच्या नाट्योत्सव प्रसंगीं मी आपलें सर्वांचें कृतज्ञभावानें अंतःकरणपूर्वक स्वागत करतों. आमच्या तोकड्या शक्तीची आम्हाला पूर्णतः जाणीव आहे. परंतु अनन्यभावाने आम्ही चालविलेल्या या कार्यांत नाट्यकलेच्या सेवेची महति जाणून आपण सर्वांनी अत्यंत प्रेमानें व उदार अंतःकरणाने आम्हाला जी साथ दिली त्यामुळे आमचें सर्वांचें अंतःकरण कृतज्ञताभावानें भरून आलें आहे.

सुमारें १५–१६ वर्षांपूर्वीची गोष्ट. महाराष्ट्र नाट्यसंमेलनाचें कार्य त्या वेळीं आम्ही नागपूरवरून चालवित होतों. त्या वेळीं मुंबई येथे भरलेल्या नाट्यसंमेलन प्रसंगीं बोलतांना अत्यंत व्यथित अशा अंतःकरणाने 'अहो आम्हाला उभे राहायला तरी जागा द्या' अशी, आजचे आपले सन्माननीय अध्यक्ष श्री. नटवर्य केशवराव दाते यांनी, महाराष्ट्रीय नाट्यरसिकांना कळवळून विनंती केली होती. एके काळीं वैभवांत लोळणाऱ्या मराठी रंगभूमीवरील एका थोर, ख्यातनाम नट, दिग्दर्शक व एका ध्येयवादी नाट्यसंस्थेच्या मालकाने दैववश प्राप्त लाचारीनें काढलेल्या या बोलांनी माझ्याप्रमाणेच तेथें उपस्थित असलेल्या सर्वच नाट्यरसिकांच्या अंतःकरणाला हालवून सोडलें होतें. त्या वेळीं रंगभूमीची अवस्था निर्वासितासारखी झाली होती. रंगमंचांचा महाराष्ट्रांत पूर्णतः अभाव ही एक भयाण समस्या होती. सुदैवाने आज आमच्या नाट्योत्सवाच्या प्रसंगीं 'आपण व्यथित होऊं नका. आपल्या निष्ठायुक्त नाट्यसेवेने ऋणाईत असलेला महाराष्ट्रीय व त्यांतहि विशेषत्वानें नागपूरस्थ नाट्यरसिक वर्ग आपली ती इच्छा पूर्ण करण्यासाठी बद्धपरिकर झाला आहे' हें सांगण्यासाठी अशा थोर नाट्योपासकाला आपल्याला आज पाचारण करतां आलें हें आपलें महद्भाग्य मी समजतों. आणि नाट्यकलेसारख्या अभिजात, जनकल्याणकारी कलेच्या सेवेसाठी आम्ही सर्व निष्ठेने कार्य करूं असा वि. सा. संघाच्या नाट्य समितीच्या वतीनेच नव्हें, तर आपणा सर्व नागपूरस्थ रसिकांच्या वतीने दिलासा देण्यासाठी आपली सर्वांची विश्वासपूर्वक परवानगी गृहित धरतों.

यापूर्वी अभिनव नाट्यमंदिर या संस्थेनें नागपूर येथें नाट्यसंमेलन भरविलें होतें व १९४३ सालीं त्याच संस्थेने मराठी रंगभूमीचा शताब्दि महोत्सव साजरा केला होता. त्यानंतर वि. सा. संघाच्या नाट्योत्सवाचा हा पहिलाच सोहाळा आहे. प्रयत्नांची पराकाष्ठा करून आम्ही या नाट्योत्सवांत सर्वच नागपूरस्थ नाट्यरसिकांचें व नाट्यसंस्थांचें सहकार्य अपेक्षिलें व तें सहकार्य आपण सर्वांनी आनंदाने दिलें याबद्दल आम्ही आपले अत्यंत आभारी आहोंत. विदर्भ साहित्य संघाच्या द्वारा नाट्यकलेच्या सेवेसाठीच आम्ही हें कार्य चालविलें आहे. तीन लाखांच्यावर खर्च येईल इतकें प्रशस्त व अद्ययावत सोईनिशी सुसज्ज अशा रंगमंचाच्या बांधकामाला सुरवातहि झाली आहे. या रंगमंचाची कोनशिला भारत सरकारचे भूतपूर्व अर्थमंत्री व जगद्विख्यात अर्थशास्त्रज्ञ व नाट्यरसिक श्री. चिंतामणराव देशमुख यांच्या हस्तें बसविली असून मंदिरसमितीचे नाना जोग आदि सदस्य अष्टौप्रहर या कामासाठी निष्ठेने खपत आहेत. मराठी रंगभूमि लोकाश्रयावरच वैभवशाली झाली व तोच लोकाश्रय या रंगमंचाच्या वास्तुपूर्ततेसाठीहि आमच्या पाठीशीं आहे.

रंगमंचाची वास्तुपूर्ति हा आजच्या आमच्या या नाट्योत्सवाचा एक हेतु असला तरीहि त्याच्या इतकाच महत्त्वाचा दुसराहि हेतु आमच्या मनांत आहे. रंगभूमीची सातत्याने सेवा करणाऱ्या व्यवसाइकांची सोय आमच्या रंगमंचाच्या द्वारा होईलच. परंतु नाट्यकलेचा सर्वांगीण व शास्त्रशुद्ध अभ्यास व्हावा, जाणते अभ्यासक निर्माण व्हावेत, खऱ्या नाट्याची जाणीव ठेवून नाट्यकलेचें, नाटकांचें मूल्य-

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

मीपन करणारे रसिक प्रेक्षक, सहृदय टीकाकार निर्माण व्हावेत, नाट्यकलेसंबंधी पोटतिडीक असणारे चोखंदळ, निष्ठावान कलावन्तहि पुढे यावेत, व सुप्तावस्थेंत त्यांच्यांत [illegible] ास करणाऱ्या नाट्य व अभिनय-गुणांचा योग्य तऱ्हेने विकास व्हावा हाहि आमच्या या नाट्योत्सवा [illegible] सरा हेतु आहे. विदर्भ साहित्य संघाची नाट्य समिति या दृष्टीनेच आजवर कार्य करीत आली अ [illegible] नाट्यकलेची सेवा नाट्यप्रयोगांनीच अधिक होऊं शकते, ही जाणीव ठेवूनच या गोष्टींना अव [illegible] मिळावा म्हणूनच आमची ही रंगमंचाची योजना आहे.

महाविद्यालयीन नाट्यप्रयोगांची स्पर्धा या वर्षापासून घडवून आणण्याचा आम्ही उपक्रम सुरू केला व श्री. मनोहर खोलकुटे यांनी, अभिजात नाट्यरसिक असे आपले वडील श्री. बाबासाहेब खोलकुटे यांच्या षष्ट्यब्दिपूर्तीच्या निमित्ताने एक फिरती ढाल ठेवू [illegible]. वि. सा. संघाला देऊन आमची योजना स्थिरमान केली आहे. त्यांचे आणि माझे जिव्हाळ्याचे [illegible] विचारांत घेतां या प्रसंगीं त्यांचे केवळ औपचारिक आभार मानून त्यांच्या निरपेक्षतेच्या भावनेला मी [illegible]वूं इच्छित नाही.

नाट्यसाहित्याच्या दृष्टीनेहि नाट्यसाहित्यावर अधिकारी असलेल्या विद्वानांच्या भाषणमाला गुंफून आजच्या अभ्यासकाला आम्ही शास्त्रशुद्ध व विधायक अशी नाट्यदृष्टि देत आलों आहोंत. परीक्षांच्या दृष्टीने कां होईना नाट्यप्रबंधांचा अभ्यास करतांना त्या नाट्यप्रबंधाकडे कोणत्या दृष्टीने पाहिलें पाहिजे, नाटक व इतर वाङ्मयांत फरक कोणता, नाटकाचें रसग्रहण कसें करावें, खरें नाट्य कशांत असतें हें जाणण्याची चोखंदळ दृष्टि विद्यार्थ्यांत सुरवातीपासूनच विकसित व्हावी या हेतूनें परीक्षांना नेमलेलीं नाटकांचीं पाठ्य पुस्तकें घेऊन केवळ विद्यार्थ्यांसाठीहि नाट्यसमिती चर्चा अथवा भाषणांच्या द्वारां विद्यार्थीमित्रांना मदत करीत असते. अभिनयाच्या शिक्षणाच्या दृष्टीनेहि नट व दिग्दर्शकांच्या सहकार्याची आम्हाला अपेक्षा असून अशा स्वरूपाच्या योजनाहि आम्ही विचारांत घेत आहोंत.

नागपुरांतील सर्वच नाट्योपासकांचा व नाट्यसंस्थांच्या नाट्यप्रयोगांचा अंतर्भाव या नाट्योत्सवांत नाइलाजाने आम्ही करूं शकलों नाही याची खेदकारक जाणीव आम्हाला आहे. आम्हाला सर्वांचेंच सहकार्य हवें आहे. आपपरतेच्या भावाला आमच्या मनांत यत्किंचितहि थारा नाही. म्हणून ज्या संस्थांच्या नाट्यप्रयोगांचा अंतर्भाव या नाट्योत्सवांत होऊं शकला नाही त्या सर्व संस्थांनी आमच्या अडचणी विचारांत घेऊन आम्हाला क्षमा करावी, अवसर मिळतांच आपल्याहि नाट्यगुणांचा आम्ही तत्परतेनें व प्रेमाने आदर करूंच असें आश्वासन याच प्रसंगीं या संस्थांना वि. सा. संघाच्या नाट्य समितीच्या वतीने मी देतों.

यंदाच चालू केलेल्या महाविद्यालयीन नाट्यस्पर्धेत एकून सहा महाविद्यालयांनी भाग घेण्याचें कबूल केलें होतें. परंतु त्यांपैकी दोन महाविद्यालयांना अपरिहार्य अडचणीमुळे भाग घेता आला नाही. चार महाविद्यालयांनी या स्पर्धेत भाग घेतला. या स्पर्धेत निवड समितीने नागपूर महाविद्यालयानें करून दाखविलेल्या 'खडाष्टक' नाटकाच्या प्रयोगाला सर्वोत्कृष्ट ठरविलें असून या नाट्योत्सवांत त्या नाटकाचा प्रयोग १३ तारखेला व्हावयाचा आहे. निरनिराळ्या महाविद्यालयांचे आम्ही जे नाट्य-प्रयोग पाहिले त्यांतून हौशी नटांतहि उत्तम प्रकारचे नाट्यगुण आढळले. कांही नाट्यप्रयोगांत कांही नटांच्या भूमिका सराईत व उत्तम कसलेल्या नटाइतक्या चांगल्या झाल्या. आणि या सर्व कलावंतांनी नाट्यकलेचा निष्ठापूर्वक अभ्यास केला व परिश्रमपूर्वक तालमी घेऊन प्रयोग बसविलें तर निवड समितीसहि कोणाला सर्वोत्कृष्ट ठरवावें हें न सुचण्याइतकी परिस्थिति ते निर्माण करूं शकतील, असा विश्वास निवड समितीच्या वतीने या सर्व कलावंतांना मी देऊं शकतों.

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

सारांश, नाटचकलेची सर्वांगीण उन्नति व्हावी, तिचा शास्त्रशुद्ध व निष्ठायुक्त अभ्यास व्हावा, ती सुप्रतिष्ठित व्हावी व वैभवप्राप्त व्हावी यासाठी विदर्भ साहित्य संघाची नाटचसमिति कार्य करीत आहे.

या आमच्या कार्यांत आम्हाला निश्चित मार्गदर्शन करण्याचा ज्यांचा अधिकार आहे, अशाच योग्य अध्ययांची आम्ही निवड केली आहे व स्वतःच्या प्रकृतीची यत्किंचित् आडकाठी न येऊ देतां नटवर्य दाते यांनी हें अध्यक्षस्थान भूषविण्याचें अत्यंत प्रेमानें कबूल केलें. गेलीं ४०–४५ वर्षें आजच्या आपल्या अध्यक्षांनी नाटचकलेची अविरत सेवा केली आहे. भूमिकांच्या निर्मितींत, दिग्दर्शनांत–अभिव्यक्तींत त्यांनी अनेक विक्रम केले आहेत. ध्येयनिष्ठ, चारित्र्यवान नट व दिग्दर्शक या नात्यांनी त्यांनी नाटचकलेच्या मंदिरांत महनीय अशी सेवा केली आहे.

अखिल महाराष्ट्रांत नाटचविषयक कार्य करणाऱ्या सर्व संस्थांनी एकसंघत्वानें परस्परांच्या सहकार्यानें नाटचकलेची सेवा करावी अशी वि. सा. संघाची अंतःकरणापासून इच्छा आहे. ती आपली इच्छा वि. सा. संघाच्या नाटचसमितीने पुणें, नाशिक, मुंबई येथील नाटच संस्थांपुढे व्यक्तहि केली आहे. ती आपली इच्छा सफल झाल्यास परस्परांचे अनुभव, प्रगटनांची अद्ययावत साधनें, तंत्रप्रकार यांबाबत विचार होऊन परस्परांना विधायक रीतीने तो विचार मार्गदर्शनपर होऊं शकेल. आणि आजहि नानाविध अडचणींनी त्रस्त असलेल्या नाटचकलेचा प्रपंच बऱ्याच प्रमाणांत सुव्यवस्थित करता येईल असा विश्वास वाटतो. या दोन्हीहि हेतूंच्या पूर्ततेच्या दृष्टीनें आजचे अध्यक्ष या कार्यांत एक साखळी जोडण्याच्या दृष्टीनें आमचा प्रेमपूर्वक हक्काचा दुवाच आहे असा आमचा विश्वास आहे. अशा थोर व अधिकारी व्यक्तीच्या मार्गदर्शनाची भाग्याची संधि आपल्याला प्राप्त झाली आहे. तें मार्गदर्शन आपण करावें, होईल तितकी नाटचकलेची सेवा निरपेक्ष बुद्धीने व श्रद्धायुक्त निष्ठेनें आम्ही करूंच करूं असें आश्वासन वि. सा. संघाच्या वतीने अध्यक्षांना मी देतों.

शक्त्यनुसार व प्रयत्नांत कोणत्याहि प्रकारें कुचराई न करतां आम्ही या नाटचोत्सवाची तयारी केली आहे. तरीहि आमच्या व्यवस्थेंत कांही उणीवा–कमतरता असण्याचा संभव आम्ही अमान्य करूं शकत नाही. आजवर दाखविलेल्या आत्मीयतेने अशा उणीवांकडे सदय अंतःकरणानें आपण दुर्लक्ष कराल व आमची ही सेवा गोड मानून घ्याल अशी आशा व्यक्त करून व पुनः एकवार आपलें अत्यंत प्रेमभावाने स्वागत करून माझें हें निवेदन संपवितों.

× × ×

प्रमुख सचिवांच्या वरील निवेदनानंतर सहकारी नाटचोत्सव समितीचे अध्यक्ष श्री. बाळासाहेब अण्णेगिरी यांचें स्वागतपर भाषण झालें.

नाट्योत्सव समितीचे अध्यक्ष श्री. अण्णेगिरी यांचें स्वागतपर भाषण

आजच्या आपल्या नाटचोत्सव प्रसंगीं आपणा सर्वांचें मनःपूर्वक स्वागत करतांना मला अत्यंत आनंद होत आहे. नटवर्य केशवराव दाते यांनी वेळांत वेळ काढून आमच्या विनंतीला मान देऊन आमचें आमंत्रण स्विकारलें व आमचा जो बहुमान केला त्याबद्दल त्यांचा मी अत्यंत आभारी आहें.

प्रमुख सचिवांच्या निवेदनांत म्हटल्याप्रमाणे रंगमंदिराच्या अभावांतून ही नाटचोत्सवाची कल्पना निर्माण झाली. तसें म्हटलें असतां केवळ रंगभूमीकरिता राखीव व उत्तम असें रंगमंदिर मोठ्या शहरांत देखील नसतें असें म्हटलें तरी चालेल. मुंबई साहित्य संघाच्या, प्रेक्षागृह उघडें असलेल्या

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

रंगमंदिराचा काय तो एक अपवाद आहे. त्या दृष्टीनें वि. सा. संघानें केलेला हा प्रयत्न आणि त्यांत मिळविलेलें यश स्पृहणीय खास म्हणतां येईल. अर्थात त्याला आपल्यासारख्या रसिकांचा पाठिंबा मिळाला नसता तर तें यश अशक्यप्राय होतें.

माझ्या माहितीप्रमाणे कित्येक वर्षांत नाटचोत्सवाचा हा पहिलाच सोहळा आहे आणि त्याच्या यशापयशाचें मोजमाप आपण त्या दृष्टीनेंच कराल अशी आशा आहे.

कांही महिन्यांपूर्वी आपले भारत सरकारांतील भूतपूर्व मंत्री श्री. चिंतामणराव देशमुख यांनी रंगमंदिराची कोनशिला बसविली त्या प्रसंगीं आपण हजर असालच. त्या प्रसंगाच्या निमित्तानें रंगमंदिराची सर्व योजना व अपेक्षित खर्च यांची संपूर्ण माहिती आपण ऐकलीच. या रंगमंदिराला तीन लाखांच्या वर खर्च येणार असून सरकारी अनुदान जमेस धरलें तर फक्त एक तृतीयांश इतकीच रक्कम उभारली गेली आहे. या कार्याकडे आपण उदार अंतःकरणाने लक्ष पुरविलें तरच हें रंगमंदिर अपेक्षेप्रमाणे तयार होऊं शकेल. या उत्सवाच्या निमित्ताने आपण सर्वांनी या कार्याला जो हातभार लावला त्यावरून आपली सर्वांची रसिकता व रंगभूमीविषयी आपल्या मनांत असणारें आंतरिक प्रेम स्पष्टपणें दिसून येतें.

आजच्या आपल्या अध्यक्षांचा या प्रसंगीं मी परिचय करून देणें कदाचित धाडसाचें ठरेल. कारण ते आपल्या रंगभूमीवरील सेवेमुळे व गेलीं ४०–५० वर्षें त्यांनी रंगभूमि व बोलपट या दोन्ही क्षेत्रांत गाजविलेल्या अपूर्व कामगिरीमुळे ते आपल्याला पूर्णतः परिचित असूनहि आपल्याला त्यांचा परिचय नाही असा आरोप मी कारण नसतां आपल्यावर करीत आहे असें त्यामुळे आपल्याला वाटेल. परंतु त्यांचा परिचय करून दिला नाही तर या प्रसंगाला उचित असा त्यांच्या अलौकिक कार्याचा गौरव मी करावयास चुकलों असेंहि होण्याचा संभव आहे. नटवर्य दाते यांचे आणि माझे खासगीहि ऋणानुबंध आहेत. तरीहि थोडासा औपचारिकपणाचा आरोप पदरीं घेऊन पदप्राप्त शिष्टाचाराला अनुसरून त्यांचा परिचय करून देतों.

नटवर्य दाते यांचें वय आज ६७ वर्षाचें आहे. वयाच्या १२–१३ वर्षापासूनच त्यांनी नाटकांत भूमिका करावयास सुरवात केली. आणि महाराष्ट्र नाटक मंडळीच्या रंगपीठावर त्यांनी अनेक चिरस्मरणीय अशा भूमिका वठवून दाखविल्या. नटवर्य दाते यांनी सुरवातीला स्त्रियांच्या यशस्वी भूमिका करून दाखविल्या हें आज त्यांच्याकडे पाहून कोणाला खरेंहि वाटणार नाही. त्यांची 'झनक झनक पायल बाजे' या बोलपटांतील भूमिका ज्यांनी पाहिली असेल त्यांना नटवर्य दाते इतके वयोवृद्ध झाले आहेत या गोष्टीवर विश्वासहि बसला नसता. महाराष्ट्र नाटक मंडळी ध्येयप्रेरित अशा सुशिक्षितांनी चालविली होती. त्या नाटचसंस्थेची परंपरा उज्ज्वल राखण्याचें कार्य नटवर्य दाते यांनी केलें आहे. महाराष्ट्र नाटक मंडळींतील दात्यांसारख्या नटांनीच नाटचाचार्य खाडिलकरांच्या नाटकांतील दीप्तिमान ध्येयप्रधानता साकार केली आणि नाटचकला सर्वसामर्थ्यशाली राजसत्तेलाहि हादरा बसवूं शकते हें त्यांच्या 'कीचक वध' 'भाऊबंदकी' या नाटकांनी सिद्ध केलें. महाराष्ट्र नाटकमंडळीच्या मालकींत गेल्यावर एकापेक्षा एक सरस अशा विचित्र, शहाजी, कवीश्वर, सत्यपाल, औरंगजेब, गणोजी शिर्के आदि भूमिका त्यांनी "झाले बहु, होतिल बहु परंतु या सम हा" असें सार्थतेने म्हणतां येईल अशा प्रकारें गाजविल्या. सारें आयुष्य नाटचव्यवसायांत घालवूनहि आपली ध्येयनिष्ठा, सौजन्य, निरंहकारी स्वभाव, अजातशत्रुत्व व चारित्र्य या गुणांमुळे ते आयुष्यभर सर्वांच्या आदरास पात्र झाले. तसें म्हटलें तर शालेय शिक्षण कमी झालेलें असतांहि स्वतःच्या ध्येयवादित्वामुळे व नाटचकलेवरील निष्ठेमुळें त्यांनी नाटचकलेचा, पौर्वात्य व पाश्चिमात्य शास्त्रांच्या दृष्टीने अभ्यास केला. म्हणून महाराष्ट्र

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

नाटकमंडळीनंतर नाट्यमन्वन्तराची सुरवात करतांना त्यांनी नव्याची आवड असणाऱ्या प्रेक्षकांना आपलें नवीन रूप दाखविलें व त्यांतहि त्यांनी त्यांच्या ठिकाणीं वसणाऱ्या अनुपमेय नाट्य-गुणांचा सर्वांना प्रत्यय घडवून दिला. त्यांच्या तपश्चर्येमुळेच या नाटचोत्सवाचें अध्यक्षस्थान मंडित करण्यासाठी श्री. दाते यांच्यापेक्षा अधिक लायक व्यक्ति आम्हाला दुसरी आढळली नाही.

आपण सर्व त्यांचें भाषण ऐकावयास अत्यंत उत्सुक झालां असाल याची मला जाणीव आहे. तेव्हा या उत्सवाच्या निमित्तानें ज्यांनी आम्हाला प्रेमानें मदत केली, ज्या संस्थांनी सहकार्य दिलें त्यांचें अंतःकरणापासून आभार मानून नटवर्य दाते यांनी आमच्या नाटचोत्सवाचें उद्‌घाटन करून आम्हाला मार्गदर्शन करावें अशी मी त्यांना विनंती करतों.

× × ×

सहकारी नाटचोत्सव समितीच्या अध्यक्षांच्या भाषणानंतर विदर्भ साहित्य संघ व नागपुरांतील सर्व नाट्य संस्थां व इतर सार्वजनिक संस्थांतर्फे श्री. नटवर्य केशवराव दाते यांना हार अर्पण करण्यांत आले नंतर नटवर्य केशवराव दाते यांचें ओजस्वी असें अध्यक्षीय भाषण झालें.

नटवर्य श्री. केशवराव दाते यांचें अध्यक्षीय भाषण

नाट्यप्रेमी रसिक बंधुभगिनींनो,

विदर्भ साहित्य संघातर्फे भरणाऱ्या या नाट्यमहोत्सवाचें अध्यक्षपद आपण माझ्याकडे सोपविलें खरें, परंतु त्याचा स्वीकार करतांना मला मनस्वी संकोच होत आहे. या प्रसंगीं उपस्थित झालेल्या प्रेक्षकगणांमध्ये प्रथितयश नाटककार, साहित्यिक, संशोधक, समीक्षक, व्यासंगी विद्वान, उच्चाधिकारी, उदार व कलांचे आश्रयदाते असे धनिक आणि कलेविषयी माझ्याहून अधिक जाण आणि रसिकता असलेली मंडळी बसली आहेत.

नळ–दमयंती किंवा कृष्ण–रुक्मिणी यांच्या मधुर प्रेमकथांचा हा प्रदेश. भवभूतीची ही जन्मभूमि. मराठींतले एक प्रमुख नाट्याचार्य कै. श्रीपाद कृष्ण कोल्हटकर, 'नारिंगी निशाण' फड-कवणारे अच्युत बळवंत कोल्हटकर, तेजस्वी नाटककार वीर वामनराव जोशी यांची स्मृति विदर्भाचें नांव काढल्यावर कोणाहि नाट्यसेवकाला झाल्याशिवाय कशी राहील ? आजहि ना. रा. बामण-गांवकर, वा. वा. भोळे, नाना जोग यांसारखे नाटककार, साहित्यिकांच्या पंक्तींत ज्यांच्यासाठी अनेक पाट रिकामे ठेवावे लागतील, असे देशपांडे नांवाचे धुरंधर; माडखोलकरांसारखे चतुरस्त्र साहित्यकार, रसिकतेचा वडिलोपार्जित वारसा मिळालेले खापर्डेबंधु आणि श्रीमान बाबुरावजी देशमुखांसारखे कलावंतांना आश्रय देणारे धनिक हे विदर्भाचें नांव उज्ज्वल करीत आहेत.

अशा स्थितींत केवळ मधुकऱ्याचें जीवन जगणाऱ्या माझ्यासारख्या व्यक्तीने या स्थानावर बसावें हें कितपत उचित दिसतें, याचा मनाला संशय पडतो. माझ्या पात्रापात्रतेविषयींचा विचार आपल्याहि मनामध्ये आला नसेल असें नाही. परंतु माझ्या इतिहासजमा झालेल्या अल्प गुणांची आठवण ठेवून आपण उदार प्रेमानें हें स्थान मला दिलें असावें, आणि तितक्याच भावभक्तीने मी तें स्वीकारीत आहें. या प्रेमाचें उतराई होणें अशक्यच आहे; परंतु आपण

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

सोपविलेल्या या जबाबदारींतून पार कसें पडावें हेंहि मला समजत नाही. चोरलेल्या किंवा उसन्या घेतलेल्या विद्वत्तेने आपल्याला चकित करणें हा एक मार्ग आहे. पण तें सिंहाचें कातडें मला पेलणार नाही. तेव्हा नाटय आणि रंगभूमि हा जो आपल्या जिव्हाळ्याचा विषय, त्याला धरून आपल्याशीं चार सुखदुःखाच्या गोष्टी कराव्यात, असें मनांत धरून मी आपल्यापुढे उभा राहिलों आहें.

मोठया मेहनतीने आपण हा भव्य नाटयोत्सव आखला आहे. अशा तऱ्हेचे नाटयोत्सव आमच्या मुंबईस बरेच दिवस चालू आहेत. परंतु आता महाराष्ट्रांत ठिकठिकाणींसुद्धा वाढत्या उत्साहाने आणि वाढत्या प्रमाणांत हे उत्सव सुरू झाले आहेत. रंगभूमिदिनाच्या निमित्ताने ठाणें आणि पुणें या शहरांमध्ये चारचार दिवस नाटयाचा सोहळा चालू होता. मराठी रंगभूमीच्या इतिहासांतल्या चालू खंडाला 'नाटयोत्सव आणि नाटयस्पर्धांचा कालखंड' असें नांव द्यायला हरकत नाही. या उत्सवांची पूर्वपीठिका पाहूं लागलों, तर १९४३ हें वर्ष आपल्याला आठवेल. मराठी रंगभूमीला १०० वर्षें पूर्ण झालीं, या घटनेच्या निमित्ताने इकडे तिकडे विखरून पडलेले कलावंत आणि चेतनाहीन झालेले नाटयप्रेमी कार्यकर्ते खडबडून जागे झाले आणि कंबर बांधून एकत्र झाले. सांगली येथे एक भव्य नाटयोत्सव त्या वर्षी झाला, त्याची स्मृति म्हणूनच मुंबई येथे दरवर्षी उत्सव होऊं लागला व तो आजतागायत चालू आहे.

नाटयोत्सवांचें हें पेव फुटलें तें केवळ योगायोगाने किंवा यदृच्छेने नव्हे. मराठी मनाच्या घडणीमध्ये आणि मराठी नाटयावर १९३० नंतर आलेल्या आपत्तीमध्ये त्याचें कारण सापडेल. मराठी माणूस हा जात्याच नाटयप्रेमी आहे. त्याचें सारें जीवनच संघर्षाने भरलेलें आहे, ही वस्तुस्थिति या नाटयप्रेमाच्या मुळाशीं असेल. अर्वाचीन रंगभूमीला सुरवात कैलासवासी विष्णुदास भाव्यांनी केली असें आपण मानतों. परंतु त्यांच्या नाटयप्रयोगांपूर्वी महाराष्ट्राच्या कांही भागांमध्ये दशावतारांची प्रथा चालू होती, असें मत विद्वान संशोधकांनी मांडलें आहे. शिवाय कीर्तनकार, पुराणिक, गोंधळी, भराडी, वासुदेव, भुत्ये, बहुरूपी इत्यादि धार्मिक कलावंतहि नाटयाचें कमीअधिक दर्शन घडवीत होते. विष्णुदासांच्या नंतर मराठी रंगभूमीला कलाप्रकार म्हणून अधिक व्यवस्थित रूप आलें आणि उत्तरोत्तर त्याचा विकास होत गेला. ही जागती परंपरा व्यावसायिक नाटकमंडळ्यांनी चालू ठेवली होती. पण १९३० च्या सुमारास त्या अस्तंगत होऊं लागल्या आणि मराठी रंगभूमीचें प्रांगण सुनें पडलें. मराठी नाटयाच्या असंख्य रसिकांची अक्षरशः उपासमार होऊं लागली. एकाहून एक कसबी नाटकमंडळ्यांनी सुरसतेंत एकमेकांशीं स्पर्धा करणारीं नाटकें त्यांच्यापुढे एकाकाळीं सादर केलीं होतीं. त्यांच्या आठवणी काढीत हळहळत बसणें एवढेंच त्यांच्या हातीं राहिलें. त्या आठवणींनी आणि मराठी रंगभूमीला काय झालें आहे, याच्या चर्चांनी नाटयरसाची त्यांची तहान भागणें शक्य नव्हतें. मराठी नाटकें हा महाराष्ट्राच्या सांस्कृतिक संचिताचा एक अतिशय महत्त्वाचा भाग, आणि अभिरुचिसंपन्न रसिकांच्या उच्च करमणुकीचें एक नेहमीचें साधन—तीं नाटकें जेव्हा रंगपीठावर दिसेनाशीं झालीं, तेव्हा नाटयरसिकांच्या जीवनांत फार मोठी पोकळी निर्माण झाली, यांत नवल नाही. ती भरून काढण्याचा एक अधुरा प्रयत्न म्हणजे

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

हे नाटयोत्सव. आजकालच्या या नाटयोत्सवांमध्ये एखादा चांगला डौलदार प्रयोग झळकून जातो, नाही असें नाही. परंतु एकंदर सर्व प्रयोगांची पातळी पाहिली तर नाटयोत्सव म्हणजे दुधाची तहान ताकावर भागवण्याचाच प्रकार वाटूं लागतो. आज नाटककार आहेत, नाटकें आहेत, दिग्दर्शक आहेत, नट आहेत आणि प्रेक्षक तर फार उत्साही आहेत. परंतु प्रत्यक्ष रंगभूमीवर मूर्त होते ती आजच्या रंगभूमीला आलेली हलाखीची स्थितीच. पूर्वीच्या काळीं या सर्व घटकांचा एकमेळ होऊन जें वरच्या पातळीवरचें, नाद आणि दृश्य यांनी बांधलेलें वातावरण निर्माण होई, त्याचा आढळ आज कांही होत नाही. पूर्वीच्या काळांत रसिकांना रंगभूमीविषयी प्रेम वाटे, त्याच-प्रमाणे आदरहि वाटे. आजच्या रसिकाला रंगभूमीविषयी फार तर कीव वाटते. पूर्वीची ती प्रेम-युक्त आदरभावना केव्हा आणि कशी लुप्त झाली, याचा शोध प्रत्येक नाटयसेवकाने आणि रसिकाने अवश्य घ्यावा असें मला वाटतें.

मराठी रंगभूमि एका काळीं किती संपन्नावस्थेत होती, याचें चित्र मनासमोर आणलें म्हणजे तुलनेने आज आपण कुठे आहोंत याची नीट कल्पना येईल, आणि पुढली वाट आखणें सोपें जाईल. मराठी रंगभूमीला जन्मल्याबरोबर दोन समृद्ध परंपरांचा वारसा मिळाला. संगीत हें मराठी मनाला प्रियच. संतकवींनी आणि शाहीरांनी अनेक संगीतप्रकार वाढीस लावले. त्यांत उत्तर हिंदुस्थानी संगीताच्या रोपटयानेहि या बरड पण सकस मराठी जमिनींत जोम धरला. या परंपरांची संस्कृतोद्भव नाटयपरंपरेला जोड मिळून संगीत नाटक हा प्रकार जन्माला आला. अण्णासाहेब किर्लोस्करांनी या नाटयप्रकाराला अभिजात कलेची प्रतिष्ठा मिळवून दिली. त्यानंतर तीस चाळीस वर्षें संगीत नाटकांनी महाराष्ट्रांत रसोत्कटतेचें एक नादमय साम्राज्यच निर्माण केलें होतें. उच्च आनंद देणें हें कलेचें एक ध्येय या नाटकांच्या द्वारा मराठी रंगभूमि फार उत्तम तऱ्हेने पार पाडीत होती. किर्लोस्करांच्याहि पूर्वी कांही वर्षें मराठींत 'बुकिश' किंवा गद्य नाटकांची परंपरा सुरू झाली. या प्रकाराची प्रेरणा ही पुष्कळशी परदेशी, मुख्यतः इंग्रजींतून मिळालेली होती. या परंपरेतून मराठीला शेक्सपियरच्या नाटकांचा परिचय झाला. या गद्य परंपरेंत संगीताला स्थान नसल्यामुळे शुद्ध अभिनयकलेचें अधिष्ठान आपोआपच अशा नाटय-कृतींना लाभलें. महाराष्ट्रांत शुद्ध अभिनयकलेची नेकीने आणि अपार कष्ट सोसून जर कोणी उपासना केली असेल, तर ती गद्य नाटकमंडळ्यांनी. पुढे १९२९ नंतर मराठी रंगभूमीवर वास्तववादाचा उदय झाला, त्याचें प्राथमिक स्वरूप या गद्य नाटकांमध्ये अंशतः दिसत होतें, असें मला वाटतें.

महाराष्ट्राच्या जीवनांत जीं राजकीय व सामाजिक आंदोलनें उठलीं, त्यांचाहि खोल परिणाम मराठी रंगभूमीवर झालेला दिसेल. महाराष्ट्राला राजकारणाचें जन्मजात वेडच आहे. त्यांत इंग्रजांच्या पूर्वी मराठयांनी स्वराज्याचा उपभोग घेतलेला; त्यामुळे १८८० पासून महाराष्ट्रांत स्वातंत्र्यासाठी वेगवेगळ्या दिशांनी प्रयत्न सुरू झाले. अनेक मराठी विद्वान, इतिहाससंशोधक, प्राध्यापक व वृत्तपत्रकार या आंदोलनांत होते, आणि त्यांपैकी बरीचशी थोर मंडळी विचार-

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

जागृतीचें एक प्रभावी साधन म्हणून नाटयाकडे वळली. या योगायोगामुळे महाराष्ट्रांतील उज्ज्वल ध्येयनिष्ठा आणि प्रखर बुद्धिमत्ता यांचा निकटचा सहवास मराठी रंगभूमीला लाभला. मराठी रंगभूमीची वैचारिक पातळी त्यामुळे उंचावली, आणि महाराष्ट्रीयांना संग्रामोन्मुख करंण्याच्या महत्कार्यांत महत्त्वाचा वाटा उचलण्याचें भाग्य मराठी रंगभूमीला लाभलें. सामाजिक सुधारणांविषयीचे जोरदार उलटसुलट मतप्रवाहहि मराठी रंगभूमीवरून खळाळत गेले. त्या सर्व वातावरणांत अनेक प्रभावी नाटयकृति लिहिल्या गेल्या, आणि तितक्याच उज्ज्वल स्वरूपांत त्या रंगभूमीवर आणल्या गेल्या. समाजधुरीण नाटककार बनले, तेव्हा नट आणि मंडळ्यांचे चालकहि त्या वातावरणाने भारून गेले. आपले सर्व अभिनयगुण त्यांना हीं नाटकें करतांना पणास लावावे लागले. या नाटकांचें आव्हान त्यांनीहि स्वीकारलें आणि त्यासाठी आपल्या कलेची साधनाहि त्यांनी जबरदस्त केली. नाटकमंडळ्या म्हणजे व्यसनांचे आणि उच्छृंखलपणाचे अड्डे अशी पूर्वी व्याख्या असे. परंतु या काळांत कांही नाटकमंडळ्यांना एखाद्या ज्ञानपीठाचें स्वरूप येऊं लागलें. महाराष्ट्र नाटक मंडळी हें अशा नाटयसंस्थेचें एक नमुनेदार उदाहरण आहे. 'नोच्चार्यो विफलोऽपि दूषणपदं दूष्यस्तु कामो लघुः' असें ब्रीद पत्करून कांही सुशिक्षित, ध्येयवान् तरुणांनी ही संस्था सुरू केली. खाडिलकरांसारखा तळपत्या प्रतिभेचा आणि उत्तुंग तत्त्वनिष्ठेचा नाटककार या मंडळीला लाभला होता आणि अण्णासाहेब कारखानीसांसारखे, जीवनमूल्यें आणि कलामूल्यें यांची शुद्धता डोळ्यांत तेल घालून जपणारे संचालक तिचें नेतृत्व करीत होते. नाटककार, सल्लागार, दिग्दर्शक, हितचिंतक इत्यादि अनेक नात्यांनी प्रो. भानू, प्रो. पानसे, प्रो. भाटे, प्रो. पटवर्धन, वासुदेवशास्त्री खरे इत्यादि थोर विद्वानांची बैठक कंपनीच्या बिऱ्हाडीं असे. अभिनयकला आणि वैचारिक पातळी यांच्या बाबतींत या कंपनीने मराठी रंगभूमीच्या इतिहासांत एक वैशिष्टयपूर्ण स्थान मिळवलें. अशी ही एकच संस्था होती असें नव्हे. कमी अधिक प्रमाणांत इतरहि कांही संस्था निष्ठा व मूल्यें निश्चित करून त्याप्रमाणे आपली दिशा आक्रमीत होत्या. महाराष्ट्र नाटक मंडळीचें नांव उदाहरणादाखल घेतलें एवढेंच. पुढल्या कालखंडांत पेंढारकरांच्या काळांतील 'ललितकलादर्श'चें नांव याच ध्येयनिष्ठ परंपरेंत घालावें लागेल असें मला वाटतें.

महाराष्ट्रांतील विशिष्ट सामाजिक व राजकीय परिस्थितींत मराठी रंगभूमीला उज्ज्वल स्वरूप प्राप्त झालें, हें आपण पाहिलें. पुढच्या अवनतीच्या मुळाशींहि अंशतः महाराष्ट्रांतील वैचारिक प्रवाह आहेत असें मला वाटतें. सनदशीर राजकीय चळवळी जरा आक्रमक होऊं लागल्याबरोबर सरकारने दडपशाही सुरू केली. यामुळे मराठी तरुणांमध्ये दोन पंथ दिसूं लागले. एका बाजूला गीता हातांत घेऊन फासावर लटकणाऱ्या सशस्त्र क्रांतिकारकांचे अनुयायी आणि दुसऱ्या बाजूला शेले-बायरन यांचे काव्यग्रंथ काखोटीस मारून गूढगुंजनांत रमत रस्त्यांतून भटकणारे रोमँटिक-संप्रदायी तरुण. या दुसऱ्या पंथाच्या प्रभावाने समष्टीच्या जीवनाकडे आणि आकांक्षांकडे रंगभूमीचें दुर्लक्ष होऊं लागलें, आणि व्यक्तीच्या खासगी सुखदुःखांना महत्त्व मिळूं लागलें. यंत्रयुगाच्या प्रभावाने समाजाची आर्थिक घडी विसकटली, त्याचा एकजिनसीपणा नाहीसा होऊं लागला, आणि कुटुंबसंस्थेला तडे गेले. पूर्वीचें स्वास्थ्य गेलें, त्याबरोबरच जुन्या

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

निष्ठा आणि श्रद्धाहि हरपल्या. उदात्त जीवनाविषयीची उत्कट आदरभावना विलयास जाऊन वैयक्तिक सुखाची तीव्र अपेक्षा निर्माण झाली.

रंगभूमीवरील याचा परिणाम म्हणजे नाटकांमध्ये केवळ मनोरंजनाचें प्रमाण वाढूं लागलें. हास्यरस आणि स्त्रीपुरुषांच्या प्रेमभावना यांच्या चित्रणांचें अधिष्ठानच व्यक्तिवादी झालें. नवीन नाटककारांच्या कृतींमधील तात्त्विक झेप कमी होऊं लागली. हळूहळू नवा वास्तववादी पंथ आला. इब्सेन व शॉ यांच्याविषयी या पंथाला आदर होता. परंतु इब्सेन आणि शॉ यांची तळमळ अस्सल होती. त्यांच्या भोवतालच्या समाजाविषयी खरोखर जें वाटलें त्याविषयी खोल विचार करून त्यांनी नाटकें लिहिलीं. तें चिंतन, ती तत्त्वनिष्ठा आणि ती तळमळ आपल्या इकडच्या वास्तववादी नाटकांमध्ये आली नाही. शॉ व इब्सेन यांनी रंगविलेल्या भव्य व्यक्ति-रेखा आपल्या नव्या नाटकांमध्ये सापडत नाहीत. नव्या आर्थिक थरांतल्या सुशिक्षित मराठी गृहस्थाचा संसार जसा जुन्या चौसोपी वाड्यांतून उठून शहरांतल्या दु-खणी फ्लॅटांत सामावूं लागला, त्याप्रमाणे आमच्या काळची ऐसपैस, लफ्फेदार नाट्यसृष्टि, एकप्रवेशी अंकांच्या नाटकांत अंग आवरून बसली. रचनेंतल्या सुटसुटीतपणाबरोबर संवादहि हलकेफुलके आणि चुरचुरीत होऊं लागले. त्यांत भावनेचें आणि भाषेचें वजन राहीनासें झालें. जुन्या नाटकांतील संवादांना जी काव्यात्मकतेची झालर असे ती दिसेनाशी झाली. शब्दांचें, वाणीचें सामर्थ्य कसाला लावणारी आशयाची दृढता आणि विशालता जाऊन सगळे संवाद नीरस, विटके आणि कृत्रिम भासूं लागले. मनोविश्लेषणाला कसलीहि दिशा नसल्यामुळे पूर्वीच्या खोल, दाणेदार भावदर्शनाऐवजी भावनांची कंटाळवाणी पिंजण सुरू झाली. हें सारें अभिनयकलेच्या नेहमीच्या आवाक्यांतलें होतें. त्यामुळे या कलेचे पंख कापल्यासारखे होऊन तिची वाढ खुंटली. कारण श्रेष्ठ नाट्याचीं हिमशिखरें ओलांडायची गरजच तिला पडेनाशी झाली.

आपल्या आजच्या कर्त्या पिढीपर्यंत रंगभूमि पोचली ती या स्वरूपांत. आधुनिक नाटकें पाहिलीं म्हणजे मला इंग्रजी जेवणाची आठवण होते. खुर्चीवर अवघडलेल्या स्थितींत एक एक पदार्थ तिखटमीठ लावून खात राहायचें. पाट, चौरंग, रांगोळ्या, उदबत्त्या अशा थाटामाटांत सनईवादन ऐकत चारी ठावांचें सुग्रास भोजन करण्याची ज्याला सवय त्याला हें सगळें कसें बेचव वाटतें ! ती रसपूर्णता कांही वेगळीच होती. माझे हे विचार आपल्याला कदाचित जुनाट-पणाचे वाटतील. कदाचित ते खरोखरच जुनाटपणाचे असतील. परंतु खरें सांगायचें म्हणजे ती पूर्वीची भव्योदात्तता आजच्या नाटकांमध्ये दिसली नाही म्हणजे चुकल्याचुकल्यासारखें होतें. कला रसिकाला आनंद देते, त्याला जीवनाचा आनंद कसा चाखावा तें शिकवते. जीवनांतील उच्च आनंदाचे आणि सौंदर्याचे गुप्त ठेवे शोधून देते. अशी कला आपल्या दैनंदिन जीवना-भोवतीच घोटाळत राहिली तर तिचें उद्दिष्ट साध्य होणार नाही. सरड्याप्रमाणे आपली धाव कुंपणापर्यंतच असेल. पण त्यामुळे कलेनेहि कुंपणाशींच थांबून चालणार नाही. परिचित जीव-नाच्या कक्षा ओलांडून तिने भरारी मारावी, आणि आमच्या दृष्टीला नवीं नवीं क्षितिजें दाखवावीं, असें मला वाटतें.

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

मित्र, मराठी रंगभूमीची आजची स्थिति कशीहि असली तरी मला तिच्या भवितव्याविषयी निराशा वाटत नाही. निराशा वाटत नाही याचें एक कारण म्हणजे आपल्यासारख्या रसिकांचा नाट्यकलेविषयीचा उदंड उत्साह. व्यावसायिक मंडळ्या लोप पावल्या, तरी आपण नाटयोत्सव करून ती उणीव भरून काढण्याचा प्रयत्न करीत आहांत. आपण एक रंगमंदिर बांधण्याचा संकल्प केला आहे. एकेकाळीं सगळीं नाट्यगृहें सिनेमाने व्यापल्यामुळे रंगभूमि निर्वासित झाली होती. आता तुमच्यासारखे कलाप्रेमी रसिक तिला नवीं घरें बांधून देत आहांत. पांच वर्षांपूर्वी मुंबई मराठी साहित्य संघाने गिरगावांत जागा घेऊन तेथे एक कच्चें उघडें नाट्यगृह उभारलें, आणि नटांना उभे राहायला जागा झाली. आम्हाला केवढा तरी आधार झाला. महाराष्ट्राच्या दुसऱ्या टोकालाहि आता तुम्ही हें आश्रयस्थान उभें करीत आहांत, ही मोठया आनंदाची आणि अभिमानाची गोष्ट आहे.

नागपूर येथे हा विदर्भ साहित्य संघ आहे. तुमच्या विभागांत विदर्भ नाट्य संघहि आहे. तशाच प्रातिनिधिक साहित्यसंस्था व नाट्यसंस्था इतर विभागांतहि कार्य करीत आहेत. या संस्थांतर्फे नाट्यमहोत्सव होत असतात. मुंबई मराठी साहित्यसंघाने गेल्या दहा बारा वर्षांमध्ये अनेक नवीं नाटकें रंगभूमीवर आणलीं, 'मॅकबेथ'चें मराठी रूपांतर अत्यंत अभिनव तंत्राने बसवलें, निर्मितीच्या बाबतींत शक्य तितकें चोखंदळ राहून दिल्लीपर्यंत मराठी रंगभूमीचा झेंडा नेला. या कारकीर्दींत या संस्थेने बराच अनुभव गोळा केला आहे. महाराष्ट्रांतील सर्व साहित्यसंस्थांनी परस्पर सहकार्याची कांही योजना आखली तर या अनुभवाचा फायदा सर्वांनाच मिळेल. आज अशा सर्व प्रयत्नांमध्ये फुटकळपणा आहे. त्यांच्यांत जर परस्पर सहकार्याने एकसूत्रीपणा आला, आणि एकमेकांच्या विभागांतील चांगले नाट्यप्रयोग इतर विभागांत दाखविण्याची व्यवस्था झाली, तर नाट्यसेवकांना एकमेकांची ओळखदेख होऊन नवे नाटककार आणि नट प्रकाशांत आल्याखेरीज राहणार नाहीत. महाराष्ट्रांतील सर्व प्रमुख ठिकाणीं फिरत्या नाटकमंडळ्यांची नाट्यप्रयोग करण्याची सोय झाली पाहिजे. म्हणजे उत्तम निर्मिति करणाऱ्या हौशी नाट्यसंस्थांनाहि सीमोल्लंघन करून महाराष्ट्रांत वेगवेगळ्या शहरीं आपले प्रयोग सादर करतां येतील. अशी व्यवस्था करण्याची जबाबदारी सध्या तरी साहित्यसंस्थांनी संभाळावी अशी माझी त्यांना प्रार्थना आहे. सरकारहि प्रत्येक शहरीं एखादें थिएटर व्यावसायिक तत्त्वावर बांधू शकेल, असें मला वाटतें. यांतूनच पुढे नाट्याचा व्यवसाय पुन्हा आपल्या पायांवर उभा राहील. व्यवसायाचा मुद्दाम उल्लेख करण्याचें कारण असें की पोटापाण्यासाठी कायमचा आणि पूर्ण वेळचा व्यवसाय म्हणून नाट्यकलावंत होणाऱ्यांच्या कलासेवेंत सातत्य, ताजेपणा राहातो; वेगवेगळीं नाटकें पुनःपुनः रंगभूमीवर करतांना अभिनयाला धार येऊं लागते, त्यांतून नाट्यनिर्मितीची शैली निर्माण होते, व नाट्यपरंपरेला गति मिळते. आज असे नाट्यव्यवसायी निर्माण होणें फार आवश्यक आहे. अण्णासाहेब कारखानीस नेहमी म्हणत की नाटकमंडळी चांगली चालण्यासाठी ॲक्टर—मॅनेजर तयार केले पाहिजेत. आपल्या कंपनीसाठी विशिष्ट धोरणाने नाटकें निवडून, योग्य नटांची निवड करून त्यांच्या प्रयोगांना निर्मितीची योग्य जोड

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

देण्याचें काम फार बिकट असतें. तें करण्यासाठी कंपनीचा संचालक साहित्याचा आणि अभिनयकलेचा मर्मज्ञ आणि स्वत: त्या कलांमधला मुरब्बी असावा लागतो. असे ॲक्टर—मॅनेजर आज हवे आहेत. नाटयमहोत्सवांमध्ये मी सुचवलें तसें परस्पर सहकार्य आलें, म्हणजे तरुण होतकरू कलावंतांना महाराष्ट्रांत चाललेले नाटयनिर्मितीचे सगळे प्रयोग पाहायला मिळतील आणि त्यांची दृष्टि चांगली तयार होईल.

मराठी रंगभूमीच्या प्रगतीला हातभार लावणारी एक घटना अलीकडे घडली, ती म्हणजे मराठी नाटय परिषदेची स्थापना. या परिषदेतर्फे याच महिन्यांत सोलापूर येथे मराठी नाटय-संमेलन भरत आहे. इतस्तत: विखरून पडलेल्या मराठी नाटयसेवकांना एकत्र आणूं शकणारी ही मध्यवर्ति संघटना निर्माण झाली आहे, तिचा जास्तींत जास्त उपयोग आपण करून घेतला पाहिजे. त्यासाठी सर्व नाटयसंस्थांनी आणि नाटयाविषयी आस्था असलेल्या व्यक्तींनी या संघटनेला आपण पाठिंबा दिला पाहिजे. तरच तिच्या अंगीं रंगभूमीच्या व्यावहारिक सुरक्षिततेसाठी झगडण्याचें बळ येईल. रंगभूमीची प्रतिष्ठा टिकावी यासाठी रंगभूमीच्या पाइकांवर नैतिक वजन पाडण्याइतकी ही संस्था बलवान व्हावी, असें मला वाटतें. अशा संस्थेचें कार्य सुरळीत चालावयाचें, म्हणजे तिला द्रव्याची गरज असते. रसिक आणि उदार अशा महाराष्ट्रीय धनिकांनी नाटयपरिषद आपल्या पायावर उभी राहावी, इकडे लक्ष द्यावें. मुंबई येथे मराठी नाटय परिषदेची शाखा कार्य करूं लागली आहे. नागपूरसारख्या केंद्रांतहि अशी शाखा स्थापन होईल अशी मला आशा आहे.

ही झाली रंगभूमीची व्यावहारिक बाजू. मला रंगभूमीविषयक श्रद्धेची बाजू तितकीच महत्त्वाची वाटते. अर्वाचीन मराठी रंगभूमीची मुहूर्तमेढ ११० वर्षांपूर्वी कै. विष्णुदास भावे यांनी रोवली. मराठी नाटयाचें हें जन्मस्थळ म्हणजे मराठी नाटयसेवकांची पंढरी. भागवत पंथीयांप्रमाणें मराठी नाटयसेवकांनीहि दरवर्षी रंगभूमिदिनाच्या दिवशीं सांगलीची वारी करावी असें माझें मत आहे. गेल्या वर्षापासून मी रंगभूमिदिनाला सांगलीची वारी करण्यास सुरुवात केली आहे. आत्माराम भेंडे, भालचंद्र पेंढारकर यांसारखे तरुण, कर्तबगार कलावंतहि यंदा सांगलीस आले होते, हें नमूद करतांना मला आनंद वाटतो. मराठी नाटयसेवकांनी तिथे येऊन नटेश्वरापुढे आपली कला सादर करावी, आणि त्या अनौपचारिक मेळाव्यांत नाटयविषयक गप्पागोष्टी मनमोकळेपणाने व्हाव्यात अशी ही योजना आहे.

मित्रहो, माझें भाषण संपलें. मी मागेपुढे न पाहातां आपलीं मतें आपल्यासमोर मांडलीं आहेत. रंगभूमीच्या स्वरूपावर त्या त्या वेळच्या राजकीय, सामाजिक, वैचारिक आणि आर्थिक परिस्थितीचा कसा परिणाम झाला, याबद्दलहि मी थोडेसें बोललों. हा विषय माझ्या ज्ञानाच्या कक्षेबाहेरचा आहे. त्यामुळे त्या माझ्या प्रतिपादनांत कांही गफलत होणें अशक्य नाही. अत्यंत गुंतागुंतीच्या अशा या प्रवाहांचा परिणाम नाटयासारख्या कलाप्रकारावर कोणता व कोणत्याप्रकारें होतो, या विषयी संशोधन आणि चिंतन करण्याची इच्छा जर माझ्या चुकांमुळे आपल्यापैकी एखाद्या अभ्यासकाला झाली, तर मला धन्यता वाटेल. अशा दृष्टिकोनांतून अभ्यासपूर्वक

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

लिहिलेला मराठी रंगभूमीचा इतिहास येत्या दोनचार वर्षांत प्रसिद्ध झाला, तर मराठी रंगभूमीच्या सेवकांना त्यापासून मोलाचें मार्गदर्शन लाभेल. आपल्या या नाटचोत्सवावर रंगदेवता अखंडपणें प्रसन्न राहो आणि आपलें भव्य आणि सुसज्ज रंगमंदिर अल्पावधींत, निर्विघ्नपणें उभें राहो, अशी नटराजाच्या चरणांशीं विनम्र प्रार्थना करून मी आपली रजा घेतों.

त्यानंतर वंदेमातरम् या राष्ट्रगीताच्या गायनानंतर तो समारंभ संपला.

× × ×

त्याच दिवशीं रात्रीं ९-३० वाजता यशवंत कला केंद्र, नागपूर या संस्थेने संगीत 'मानापमान' नाटकाचा प्रयोग सादर केला.

दिनांक ८ डिसेंबर १९५६ रोजीं रात्रीं ९ वाजतां मराठी मुंबई साहित्य संघ, मुंबई या संस्थेच्या कलाकारांनी 'होनाजी बाळा' या नाटकाचा सुंदर प्रयोग सादर केला.

दिनांक ९ डिसेंबर १९५६ रोजीं ९ वाजतां नागपूर नाट्यमंडळाने 'आंधळयांची शाळा' या नाटकाचा प्रयोग करून दाखविला.

दिनांक ११ रोजीं रात्री ९ वाजतां अभिनव नाट्यमंदिर नट संघाने 'राणीचा बाग' या नाटकाचा प्रयोग करून दाखविला.

दिनांक १२ रोजीं रात्री ९ वाजतां सारस्वत नाट्यमंडळ या संस्थेने 'उद्याचा संसार' या नाटकाचा प्रयोग करून दाखविला.

× × ×

दिनांक १३ रोजीं सायंकाळीं ५-३० वाजतां मुंबई प्रांताचे मुख्यमंत्री श्री. यशवंतराव चव्हाण यांच्या हस्तें नाटचोत्सवाचा समारोपसमारंभ झाला.

स्वागतपर पद्यगायनानें या समारोप समारंभाला सुरुवात झाली. विदर्भ साहित्य संघाचे अध्यक्ष श्री. बाळासाहेब ढवळे यांनी ना. मुख्य मंत्र्यांचें हार्दिक स्वागत करून समारंभास उपस्थित राहिल्याबद्दल कृतज्ञता व्यक्त केली व वि. सा. संघाचा इतिहास थोडक्यांत निवेदन केला. ते म्हणाले, "लोकनायक अणे व श्री. दादासाहेब खापर्डे यांच्या प्रयत्नाने वि. सा. संघ स्थापन झाला. प्रथम संघाचे कार्यालय अमरावती येथे होतें. मध्यंतरीं वि. सा. संघाचें कार्य थोडेसें मंदावलें होतें. परंतु प्रा. श्री. ना. बनहट्टी यांच्या प्रयत्नाने कार्यालय नागपुरास आल्यावर वि. सा. संघाची उत्तरोत्तर प्रगति होत गेली. आता परीक्षा समिती, नाटचोत्सवसमिती आदींतर्फे विविध क्षेत्रांत संघाचें कार्य चाललेलें आहे व रंगमंदिर उभारण्याचें कार्यहि संघाने हातीं घेतलें आहे."

नंतर नाटचोत्सव समितीचे अध्यक्ष श्री. बाळासाहेब अण्णेगिरी यांनी नाट्यसमितीचा अहवाल थोडक्यांत निवेदन करून मुख्य मंत्र्यांचें स्वागत केलें.

नाट्योत्सव समितीचे अध्यक्ष श्री. अण्णेगिरी यांनी समारोपप्रसंगीं केलेलें निवेदन

माननीय मुख्य मंत्री आणि उपस्थित बंधुभगिनींनो—

नाटचोत्सवाच्या या समारोपप्रसंगीं आपल्या सर्वांचे आणि विशेषतः आपल्या प्रांताचे मुख्यमंत्री श्री. यशवंतरावजी चव्हाण ह्यांचें मनःपूर्वक स्वागत करतांना ह्या प्रसंगीं मला अतिशय आनंद होत आहे. सरकारी आणि खाजगी कामाच्या प्रचंड व्यापांतून वेळांत वेळ काढून आणि विशेषतः नागपूरच्या आपल्या पहिल्याच भेटींत मुख्यमंत्र्यांनी आमच्या निमंत्रणास मान देऊन आजच्या समारंभास येण्याचें

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

कबूल केलें ह्याबद्दल वि. सा. संघ आणि सहकारी नाटयोत्सव समिती त्यांची अत्यंत ऋणी आहे. हा त्यांनी आमचा सन्मानच केला आहे असें आम्ही समजतों. या नाटयमहोत्सवाचें उद्‌घाटन करतांना नटवर्य श्री. केशवराव दाते ह्यांनी म्हटल्याप्रमाणे वि. सा. संघाचें ह्या बाबतींत खरोखरच नशीब दांडगें आहे असेंच म्हणावें लागेल; कारण आजच्या आपल्या सन्माननीय पाहुण्यांनी मुख्यमंत्रिपद स्वीकारल्यानंतरच्या पहिल्याच विदर्भाच्या दौऱ्यांत आपल्या असंख्य कामांतून आणि गडबडींतून वेळांत वेळ काढून आमचें आमंत्रण स्वीकारून वि. सा. संघाच्या आजवरच्या साहित्य आणि ललितकला ह्या क्षेत्रांतील कामगिरीचा गौरवच केला आहे, असें म्हणावयास प्रत्यवाय नाही.

वि. सा. संघानें सरकार आणि नागपूरची रसिक जनता ह्यांच्या सहकार्यानें आणि मदतीनें एक अद्ययावत् व संपूर्णतया आधुनिक रंगमंदिर बांधण्याचें ठरवलें. वि. सा. संघाच्या उत्साही कार्यकर्त्यांच्या परिश्रमानें आणि आपणा सर्वांच्या उदार आश्रयानें त्याला यश येऊन आपल्या सर्वांना माहिती आहेच की ह्या रंगमंदिराचा कोनशिला समारंभ भारताचे भूतपूर्व अर्थमंत्री आणि जगद्विख्यात अर्थशास्त्रज्ञ श्री. चिंतामणराव देशमुख ह्यांच्या हस्तें थोडयाच दिवसांपूर्वी झाला. ह्या थिएटरचे मदतीकरितां, आणि विदर्भांतील आणि विशेषतः नागपुरांतील हौशी आणि धंदेवाईक नटवर्गाला उत्तेजन देण्याकरतां, तसेंच येथील जनतेच्या मनांतील नाटकाविषयीची आवड जागृत करण्याकरतां हा नाटयमहोत्सव करण्याचें ठरलें. मोठया परिश्रमानें कामाची आखणी करून आणि नाटयसमितीवरील माझ्या सहकाऱ्यांच्या अविश्रांत खटपटीमुळेच विविध प्रकारचीं निवडक गद्य व संगीत नाटकें आम्ही सादर करूं शकलों. नटवर्य केशवराव दाते ह्यांनी ह्या महोत्सवाचें उद्‌घाटन केलें. आपणा सर्वांना माहिती आहेच की, हा महोत्सव ६ तारखेसच सुरू होणार होता, पण भारताचे श्रेष्ठ कायदेपंडित, समाजसुधारक व मोठे विद्वान डॉ. आंबेडकर ह्यांच्या आकस्मिक निधनामुळे त्या दिवशीं दुखवटयाची सभा घेऊन कार्यक्रम दुसऱ्या दिवसापर्यंत स्थगित केला गेला.

आतापर्यंत जीं ५ नाटकें झालीं आहेत त्यांपैकी २ संगीतप्रधान होतीं. "होनाजीबाळा" ह्या नाटकाखेरीज बाकी सर्वच नाटकें हौशी नटवर्गानें केलेलीं होतीं व त्या सर्व नाटयसंस्था नागपुरांतीलच आहेत हें महत्त्वाचें आहे. आमच्या पदरीं जें कांही थोडेंबहुत यश पडलें असेल त्याचें सर्व श्रेय अर्थातच ह्यामुळे ह्या सर्व संस्थांना आणि त्यांच्यातर्फे काम केलेल्या हौशी नटवर्गाला आणि त्यांच्या कार्यकर्त्यांना दिलें पाहिजे. नागपुरांत नाटयकलेविषयी अमर्याद प्रेम आहे आणि हौशी असून कसलेला नटवर्गहि बराच आहे. त्यांच्या कलेला व हौसेला वाव मिळावा म्हणूनच आम्ही ही मनोरंजनाची व नाटयमहोत्सवाची कल्पना काढली. नागपूरच्या रसिक जनतेनें जो उदार आश्रय आणि सहकार आम्हांस दिला त्याबद्दल आम्ही त्यांचे अत्यंत आभारी आहोंत.

वि. सा. संघानें आणि तिच्या नाटयमहोत्सव समितीनें नाटयकलेंतील एका विशिष्ट पातळीवर जो आनंद आपणास दिला आणि आपली करमणूक केली—किंवा करण्याचा प्रयत्न प्रामाणिकपणें केला, त्याचें यशापयश किंवा मोजमाप आपणच ठरवायचें आहे. माझी अशी समजूत आहे की वि. सा. संघानें हा नाटयोत्सव घडवून आणल्यामुळे नागपूरस्थ जनतेला, हौशी नटवर्गाला आणि इतर रसिक लोकांना जर कांही आनंद, उत्साह किंवा थोडेंफार उत्तेजन मिळालें असेल तर आमच्या प्रयत्नांचें सार्थक झालें असें आम्हांस वाटेल.

रंगमंदिर बांधण्याची कल्पना वि. सा. संघानें काढली हिचें कारण कित्येक वर्षे नाटकांकरतां एखादें चांगलें आणि सुसज्ज असें नाटयगृह नाही हेंच होय! ही अडचण दूर व्हावी हाच हेतु हें रंगमंदिर बांधण्याच्या मुळाशीं आहे. हें रंगमंदिर केवळ मराठी कार्यक्रम आणि नाटकें ह्यांच्याच करतां राहाणार नसून सर्वांनाच हें रंगमंदिर खुलें राहील. तथापि हें रंगमंदिर बांधण्याकरतां लागणारा पैसा

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

अजूनहि बहुतांशीं आमच्या हातीं आला नाही. म्हणूनच मी आपल्या रंगमंदिराकरिता सर्वांना उदार मनाने व सढळ हाताने मदत करावी अशी पुन: एकदा विनंती करीत आहे. आम्हाला मदत करणाऱ्यां-मधें केवळ मराठी भाषिकच नाहीत तर अन्य भाषिकही आहेत ही मोठ्या अभिमानाची गोष्ट आहे. मी त्या सर्वांचे अंत:करणपूर्वक आभार मानतों.

आपले मुख्य मंत्री स्वातंत्र्यलढ्यांतील एक खंदे वीर, कुशल राजकारणी, आणि कला आणि वाङ्मय ह्यांचे गुणग्राही रसिक आहेत. मुंबई सरकारने ह्यापूर्वीही संगीत, ललितकला आणि वाङ्मय ह्या विविध क्षेत्रांत प्रत्यक्ष लक्ष घालून आणि त्या त्या क्षेत्रांत स्पर्धा लावून यशस्वी कलावंतांना आणि संस्थांना बक्षिसें आणि देणग्या देऊन गौरव केलेला आहे. आता आमचा विदर्भ मुंबई प्रांतांत समाविष्ट झाला आहे. तेव्हा मुंबई प्रांतांतील अशा संस्थांवर आणि कलावंतांवर असलेली सरकारची तो कृपादृष्टि आणि त्या त्या सवलती आम्हालाहि मिळतील याविषयी आम्हाला पूर्ण विश्वास आहे.

या रंगमंदिराचें बांधकाम सुरूं झालें तें पूर्वीच्या मध्यप्रदेश सरकारने मदत देण्याचा निर्णय घेतल्यामुळेच होय. बांधकामाचा निम्मा खर्च देण्याचा ठराव त्या मंत्रिमंडळाने केला आहे. आणि त्या निर्णयानुसार चालू वर्षात होणाऱ्या एक लक्ष रुपयांच्या खर्चाचा निम्मा भाग म्हणून पन्नास हजाराचा खर्च त्या सरकारने आगाऊच देऊन टाकला. त्याचप्रमाणे उरलेल्या कामाच्या दोन लक्ष रुपयांच्या खर्चाचा निम्मा भार आमचें नवें मुंबई सरकार उचलील याविषयीं आम्हांला तिळमात्र शंका नाही.

माननीय मुख्य मंत्र्यांना आपलें भाषण करण्यास विनंती करण्यापूर्वी मी या नाट्योत्सवाचे प्रमुख सचिव माझे मित्र श्री. गोमकाळे यांना आपलें निवेदन करण्याची सूचना करतों.

समारोपप्रसंगीं केलेलें प्रमुख सचिवांचें आभारप्रदर्शनाचें भाषण

मान्यवर मुख्य मंत्री श्री. यशवंतरावजी चव्हाण, लो. ना. बापूजी अणे, वि. सा. संघ व सहकारी नाट्योत्सव समितीचे अध्यक्ष, आणि उपस्थित बंधु भगिनी,

प्रत्येक संस्थेच्या किंवा व्यक्तीच्या जीवनांत कांही अतिशय भाग्याचे व आनंदाचे असे प्रसंग येतात की त्या वेळीं त्या प्रसंगाच्या निमित्ताने उचंबळून येणाऱ्या भावना व आनंदोर्मि यथोचित वर्णन करण्यास शब्दाचें सामर्थ्य तोकडें पडतें. आज या प्रसंगाच्या निमित्ताने माझे भाव व्यक्त करतांनाहि शब्दांचें सामर्थ्य अपुरें पडत आहे.

आतापर्यंत वि. सा. संघाच्या नाट्यकलेविषयीच्या कार्याचा यथोचित परिचय स. ना. समितीच्या अध्यक्षांनी आपल्याला करून दिलाच आहे. अशा या नाट्योत्सवाची सांगता आमच्या भाग्याने आमच्या प्रदेशाचे विद्वान रसिक व लोकधुरीण प्रमुख मंत्री श्रीमान यशवंतरावजी चव्हाण यांच्या हस्तें होत आहे ही गोष्ट मोठी औचित्यपूर्ण आहे. आज आम्हांला लाभलेलें यश एकट्या दुकट्या माणसाच्या परिश्रमाचें फळ नसून त्याचें सारें श्रेय या कामासाठी ज्यांनी ज्यांनी आम्हाला आत्मीयतेने मदत केली त्या सर्वांना आहे.

आजच्या या प्रसंगीं आमच्या पाठीशीं तत्परतेने मदतीसाठी उभ्या असलेल्या संस्था, व्यक्ति यांनी दिलेल्या निरपेक्ष सहकार्याची आठवण येते आणि त्यांच्या उपकारांची फेड आपण कशी करूं-शकूं हें सुचत नाही.

नाट्योत्सवाच्या तारखा जशा जशा जवळ येत होत्या तसतसें उत्सवासाठी आवश्यक असणाऱ्या सोईस्कर जागेची अडचण आम्हाला तीव्रतेने जाणवत होती. आमची ही अडचण सहानुभूतिपूर्वक

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

जाणून स्वयंस्फूर्तीने हा उघडा रंगमंच व पूर्ण प्रांगण नाटचोत्सवासाठी आम्हांला दिले याबद्दल वि. सा. संघाचे विश्वस्त व नागपूर विद्यापीठाचे उपकुलगुरु श्री. अण्णासाहेब मंगळमूर्ति व विद्यापीठाचे इतर अधिकारी यांचे आम्ही आभारी आहोंत.

थंडीचे दिवस. प्रेक्षकांची सर्व सुखसोईंनी समृद्ध अशी सोय कशी करतां येईल ही दुसरी पहिल्या अडचणीइतकीच मोठी विवंचना आमच्या समोर होती. परंतु नाटचोत्सव समितीच्या भाग्याने एम्प्रेस मिल्स नागपूरच्या अधिकारीवर्गाने आमची ही अडचण लीलया दूर केली. एवढेंच नव्हे तर श्री. पंधकी—व इतर एम्प्रेस मिल्सचे कर्मचारी यांनी आपण ज्या भव्य सुंदर शामियान्यांत बसलों आहोंत तो शामियाना तयार करून दिला. हें अत्यंत मोलाचें साहाय्य आम्हाला देऊन एम्प्रेस मिल्सचे एजंट श्री. भूता व अन्य अधिकारी यांनी आम्हाला कायमचें ऋणी करून ठेवलें आहे.

या नाटचोत्सवांत होणाऱ्या प्रयोगांसाठी नागपुरांतील स्थानिक नाटचसंस्थांचें हार्दिक साहाय्य आम्हाला हवें होतें. व अत्यंत अभिमानाची गोष्ट अशी की सहकार्याची आम्हीं अपेक्षा करतांच यशवंत कलाकेंद्र, नागपूर नाटचमंडळ, अभिनव नाटचमंदिर या संस्थांनी तितक्याच आत्मीयतेने आम्हाला सहकार्य दिलें. या संस्थांनी स्वतःची पदर मोड केली, अनेक अडचणी सोसल्या व प्रयोगासाठी कराव्या लागणाऱ्या परिश्रमांची व खर्चाची तमा न बाळगतां त्यांनी उत्सवासाठी यथोचित तयारी करून या नाटचोत्सवांत 'मानापमान' 'आंधळयांची शाळा' 'राणीचा बाग' या नाटकांचे आपले प्रयोग सादर केले. 'सारस्वत' नाटचमंडळाने तर स्वयंस्फूर्तीनें, नाटचकलेची सेवा करावयाची आपल्यालाहि संधि मिळावी या आंतरिक भावनेनें स्वतःची पदरमोड करून या नाटचोत्सवांत आपला अंतर्भाव करून घेतला. या संस्थांनी आपलें सहकार्य दिलें नसतें तर हा नाटचोत्सव होऊंच शकला नसता व नाटचोत्सवांत औचित्यहि राहिलें नसतें. या संस्थांनी आपले नाटचप्रयोग या उत्सवांत करून दाखविले व नाटचकलेवरील आपलें निरपेक्ष प्रेम सिद्ध केलें याबद्दल यशवंत कलाकेंद्र, नागपूर नाटचमंडळ, अभिनव नाटचमंदिराचा कलाकार संघ व सारस्वत नाटचमंडळ या संस्थांतील चालक, कलाकार व सदस्य यांचे आम्ही मनापासून आभार मानतों.

त्याचप्रमाणे या सर्व नाटकांचे दिग्दर्शक श्री. वा. वा. भोळे, श्री. सखारामपंत जोशी, श्री. परांजपे, श्री. बाळासाहेब भावे व श्री. दिवाडकर यांचेहि आम्ही आभारी आहोंत.

आमच्या उत्सवाची शोभा द्विगुणित करण्याचें कार्य मुंबई साहित्य संघाचे कलाकार यांनी आपल्या 'होनाजी बाळा' या नाटकाचा अत्यंत यशस्वी व कलापूर्ण प्रयोग करून दाखवून केलें व वि. सा. संघ व मुंबई साहित्य संघ यांचे ऋणानुबंध अत्यंत आत्मियतेचे व घनिष्ट केले याबद्दल मुंबई साहित्य संघ व त्यांचे कलाकार श्री. सुरेश हळदणकर, श्री. पेंढारकर व त्यांचे इतर सहकारी यांचे आम्ही अत्यंत ऋणी आहोंत.

याच संदर्भात आमच्या सहकारी नाटचोत्सव समितीच्या उपाध्यक्ष सौ. सुशिलाबाई बयरामजी यांच्या हार्दिक व निरपेक्ष सहकार्याचा कृतज्ञताभावाने उल्लेख करणें आवश्यक आहे. कारण त्यांचें हार्दिक सहकार्य आम्हाला लाभलें नसतें तर 'होनाजी बाळा' या नाटकाचा प्रयोग नाटचोत्सवांत होणें जवळ जवळ अशक्य होतें. या नाटचप्रयोगासाठी त्यांनी मागणी केली तेवढा पैसा मुंबई साहित्य संघाला देण्याची शक्ति सहकारी नाटचोत्सव समितीची नाही याची कल्पना त्यांना होतीच. ही परिस्थिति जाणून त्यांनी स्वतःच्या जवळची कांही रक्कम समितीच्या रकमेंत भर घालून मुंबई साहित्य संघाला द्यावयाची रक्कम उदार अंतःकरणाने पुरी केली. एवढेंच नव्हें तर 'होनाजी बाळा' या नाट-

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

काच्या प्रयोगाबद्दलची सर्व जबाबदारी आपल्या अंगावर घेऊन त्यांनी नाटचोत्सवांत 'होनाजी बाळा' या नाटकाचा प्रयोग घडवून आणणें शक्य केलें, याबद्दल त्यांचे आम्ही कितीहि आभार मानले तरीहि ते पुरेसे होऊं शकणार नाहीत.

या वर्षापासून महाविद्यालयीन नाटचस्पर्धा आम्ही चालू केली. या नाटचस्पर्धेत यशस्वी होणाऱ्या महाविद्यालयाला देण्यासाठी माझे सहकारी मित्र श्रीयुत मनोहर खोलकुटे यांनी आपले वडील श्री. बाबासाहेब खोलकुटे यांच्या ६१ व्या वाढदिवसानिमित्त एक फिरती ढाल दिली आहे. त्यामुळेच या स्पर्धेला चालना मिळाली. त्याप्रमाणे नागपूर महाविद्यालय, वैद्यक महाविद्यालय, शेतकी महाविद्यालय, वाणिज्य महाविद्यालय, नॅशनल महाविद्यालय व हिस्लॉप महाविद्यालय यांनी आनंदाने आपले सहकार्याचे हात पुढे केले. महाविद्यालयांनी आपुलकीने या स्पर्धेत भाग घेतला. त्यांत नागपूर महाविद्यालयाच्या प्रयोगाला उच्चांक मिळाला. या आमच्या महाविद्यालयीन नाटचप्रयोगाच्या स्पर्धेत भाग घेतल्याबद्दल वरील कॉलेजांतील प्राचार्य, त्यांचे सहकारी, विद्यार्थी व नाटचमंडळें यांचे आम्ही अत्यंत आभारी आहोंत. त्याचप्रमाणे ही स्पर्धा स्थायी व्हावी या दृष्टीने श्री. मनोहर खोलकुटे यांनी जी फिरती ढाल वि. सा. संघाला दिली त्याबद्दल त्यांचे आम्ही सदैव कृतज्ञ राहूं.

संगम इलेक्ट्रीक वर्क्सचे चालक श्री. परांजपे यांनी या मंडपांत असलेलें सर्व इलेक्ट्रिक फिटिंग त्याबद्दल कांहीहि खर्च न घेतां करून दिलेलें आहे. या त्यांच्या उदारतेबद्दल व नाटचोत्सवांत आपल्याकडूनहि कांही सेवा घडावी या बुद्धीने त्यांनी आम्हाला केलेल्या मदतीबद्दल त्यांचे आम्ही शतशः आभारी आहोंत.

वृत्तपत्रकारांनी तर आम्हाला कायमचें ऋणी करून ठेवलें आहे. 'तरुणभारत,' 'महाराष्ट्र,' व 'नागपूर टाईम्स' 'हितवाद' यांनी नाटचोत्सवाला सर्व तऱ्हेने मदत केली असून नाटचोत्सवाच्या कार्यक्रमाच्या जाहिराती, त्याबद्दल कांहीहि मोबदला न घेतां, दिलेल्या आहेत. नाटचोत्सवाचे सुरवातीपासूनचें वृत्त आपल्यापर्यंत पोचविण्याचें कार्य नागपुरांतील सर्वच वृत्तपत्रांनी केलें आहे. या सर्वांचे आम्ही अंतःकरणापासून आभार मानतों.

नागपूर आकाशवाणीनें आमच्या नाटचोत्सवाला अप्रत्यक्षपणें जी वेळोवेळीं प्रसिद्धी दिली आणि उद्घाटन, समारोप आणि नाटचोत्सवांतील सर्व नाटचप्रयोग ध्वनिमुद्रित करून तीं प्रक्षेपित करण्याचें ठरविलें आहे यावद्दल नागपूर आकाशवाणीचे रसिक स्टेशन डायरेक्टर श्री. नटराजन आणि स्टेशन एंजिनिअर श्री. पेंडसे, सौ. कुसुमावती देशपांडे व त्यांचे सहकारी श्री. केशवराव गोगटे, व श्री. वुट यांना आम्ही शतशः धन्यवाद देतों.

नाटचोत्सवाचीं सीझन तिकिटें विकण्यासाठी माझ्या अनेक मित्रांचें साहाय्य झालें आहे. सौ. धनवटे, सौ. मोहनी, सौ. बयरामजी, सौ. व श्री. कोरके, सौ. शामलाबाई चितळे, श्री. चितळे, सारस्वत मंडळाचे श्री. दिवाडकर व केकरे, सहकारी नाटचोत्सव समितीचे श्री. खोलकुटे, सगदेव, गडकरी, तत्ववादी, भिशीकर, गोवर्धन अग्रवाल, वि. सा. सं. चे चिटणीस श्री. काशीकर, श्री. प्रताप वेहेरे—एम्प्रेस मिलसचे श्री. धारपुरे, आंबेकर व श्री. मराठे इ० कार्यकर्त्यांनी जिवापाड मेहेनत करून नाटचोत्सवाचें कार्य यशदाई केलें. या सर्व मित्रांचा मी अत्यंत आभारी आहें.

नाटचोत्सवाच्या उद्घाटनसमारंभाच्या वेळीं आकर्षक असें पूजा नृत्य आपण पाहिलें. नाटचोत्सवाची आकर्षक सुरवात व्हाव्यास या नृत्याने चांगलीच भर घातली. अशा तऱ्हेनें नाटचोत्सवाला आकर्षकपणा आणून दिल्याबद्दल सौ. मणी व त्यांचे कलाकार यांचे आम्ही आभारी आहोंत.

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

आपण नागपुरस्थ नाट्यरसिकांनी आभारप्रदर्शनाचें कार्य माझ्यासाठी फारच कठीण करून सोडलें आहे. आपल्या निरपेक्ष नाट्यप्रेमाचें व सर्वतोपरीने आपण आम्हाला दिलेल्या साहाय्याचें कोणत्या शब्दांत वर्णन करूं हेंच मला कळत नाही. आपण आमच्यावर जें हें निरपेक्ष प्रेम दाखविलें, नाट्यसमितीच्या लोकांना आपण आपल्या उदारतेमुळे जें समाधान दिलें त्याबद्दल आम्ही आपले कायमचे ऋणी राहूं. गेल्या सप्ताहांत एवढ्या मोठ्या प्रमाणांत उपस्थित राहून नाट्योत्सवाच्या कार्यकर्त्यांना कोणत्याहि अडचणींचें साकडें न घालतां आपण सर्व एका कुटुंबाचेच घटक आहोंत असा अपूर्व जिव्हाळा दाखविला याबद्दल, आपल्या सर्वांचे आभार मानतों. आपल्या निरपेक्ष प्रेमाचा असा लाभ आम्हाला सदैव मिळावा अशी याचना करतों.

या नाट्योत्सव समितीचा सचिव म्हणून माझ्या शक्तीनुसार मी गेले ४ महिने दिवस रात्र खपलों. माझ्या परिमित शक्तीची मला जाणीव होतीच. त्यामुळे हा नाट्योत्सव सर्वार्थाने माझ्या सहकाऱ्यांच्या मदतीनेच यशस्वी होऊं शकला. त्यामुळे मी व्यक्तिशः माझ्या अशा सहकारी मित्रांचा या ठिकाणीं उल्लेख केला नाही तर मी आपल्या आवश्यक कर्तव्याला विसरलों असा औचित्य-भंगाचा दोष माझ्याकडे येईल. या सर्व कार्यांत माझ्यावर नागपुरस्थ व बाहेरच्या व्यक्तींनी महदुपकार केलेले आहेत. त्या सर्वांची नामावली आज वाचतां येणें अशक्य आहे. परंतु त्यांतहि कांहींचा उल्लेख करणें आवश्यक आहे. स. ना. समितीचे अध्यक्ष श्री. बाळासाहेब अण्णेगिरी व सौ. शांताबाई अण्णेगिरी यांची या कामासाठी आस्थेने मला मदत झाली नसती तर या नाट्योत्सवांतील प्रत्येक काम फारच बिकट झालें असतें. या नाट्योत्सवासाठी स्वतः बाळासाहेब तर खपलेच, परंतु त्यांच्या बरोबर आणखीहि त्यांचे सहकारी मित्र खपले. कुठे उणें पडूं देऊं नये यासाठीच त्यांनी व श्री. पंचकी, श्री. मराठे आदि त्यांच्या मित्रांनी सर्वतोपरी कष्ट घेतले आहेत. तीच गोष्ट सौ. सुमतीबाई धनवटे यांची, नव्हे त्यांच्या सर्वच कुटुंबियांची. माझ्या सहकारी सचिवांपैकी श्री. बाबुराव चिमोटे, श्री. खोलकुटे, श्री. तत्त्ववादी, श्री. गडकरी, श्री. भिशीकर, श्री. बाबासाहेब खोलकुटे, श्री. बनहट्टी यांचाहि आदरपूर्व उल्लेख करणें आवश्यक आहे. या नाट्योत्सवासाठी पडेल तें काम त्यांनी केलेलें आहे. वि. सा. संघाचे अध्यक्ष श्री. बाळासाहेब ढवळे यांचाहि उल्लेख येथे आवश्यक आहे. नाट्योत्सव समितीच्या कार्यकर्त्यांचाहि तितकाच आदरपूर्वक उल्लेख मी करतों.

शेवटीं आपण सर्वांनी या कार्यांत जी मला निरपेक्षतेने मदत केली त्याबद्दल मी आपला कायमचा ऋणी आहें. या आमच्या कार्यांत कांहीं उणिवाच नव्हत्या असें आम्ही कधीच समजलों नाही. उलट त्या उणिवा आपण अत्यंत प्रेमाने झाकून टाकून आपली सर्व योजना निर्दोष असल्याचा आनंद आम्हाला दिला आहे. आपण आजचे सन्माननीय पाहुणे यांचें भाषण ऐकावयास उत्सुक आहोंत. तरी उण्या अधिकाची सदयतेने क्षमा करावी.

× × ×

प्रमुख सचिव, श्री. गोमकाळे यांच्या आभारप्रदर्शनाच्या भाषणानंतर विश्वविद्यालयीन यशस्वी प्रयोगासाठी ठेवलेली खोलकुटे ढाल नागपूर महाविद्यालयाच्या नाट्य मंडळाचे श्री. डांगरे यांना मुख्य-मंत्री यांचे हस्तें देण्यांत आली व मुख्य मंत्र्यांनी आपलें भाषण सुरू केलें.

समारोपाचें भाषण करतांना वि. सा. संघ, नाट्यसमिती, रंगमंदिराचें कार्य आदींचा उल्लेख करून ना. मुख्य मंत्री म्हणाले, "या नाट्योत्सवाच्या उद्घाटनास येण्याचें मी कबूल केलें होतें. परंतु कामामुळे मी येऊं शकलों नाही, तरी समारोपास आलोंच आहें. नाट्योत्सवाच्या उद्घाटनाच्या वेळच्या

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

'मानापमाना'चें वर्णनहि मी इथें आल्यावर ऐकलें. पुन: कधी तरी तो प्रयोग पहाण्याची संधि मिळेल अशी आशा मी करतों. नाटक ज्याप्रमाणें शेवटीं कळूं लागतें त्याप्रमाणे आपण मला इथें कशासाठी बोलावलें आहे हें आपलीं भाषणें ऐकून शेवटीं कळलें आहे. रंगमंदिराला म. प्र. सरकारने निम्मी मदत दिली असल्याचें आपण सांगितलें. परंतु लौकर हो म्हणणार नाही व लौकर नाही म्हणणार नाही, अशा कारभाऱ्यांपैकी मी एक आहे. नाही म्हणणें अन्यायाचें होईल व होय म्हणणें लबाडीचें होईल. म्हणून मी फक्त 'विचार करीन' एवढेंच आश्वासन देतों. परंतु जुन्या सरकारचीं आश्वासनें नवीन सरकार पाळतें हा शासनाचा संकेत मला माहित आहे, एवढेंच सांगून ठेवतों."

नंतर नागपूरच्या सांस्कृतिक महत्वाचा उल्लेख करून ते म्हणाले, "देशांत इतर रंगभूमींप्रमाणेंच आघाडीवर असलेल्या मराठी रंगभूमीची आपण सेवा करीत आहांत. मराठी रंगभूमीच्या दर्जा टिकविण्याचें काम हौशी व शौकीन नटांनी केलें आहे हें आपण पहातोंच आहोंत, मराठी भाषा व रंगभूमि यांचेबद्दल असलेल्या जिव्हाळयांतूनच या गोष्टी निर्माण होत असतात. हें प्रचंड सांस्कृतिक कार्य आपण करीत आहांत याबद्दल मला आनंद वाटतो. समाजाचें व्यक्तिमत्व हें फार महत्वाचे असल्याने नाटयकलेद्वारा आपण समाजाची सेवा करीत आहांत ही मोठी अभिमानाची गोष्ट आहे. अशीच आपली उत्तरोत्तर प्रगति होत जावो हीच इच्छा."

राष्ट्रगीतानंतर समारोपसमारंभ संपला.

× × ×

त्याच दिवशीं रात्रीं १० वाजतां खोलकुटें ढाल मिळविण्यास पात्र ठरलेल्या नागपूर महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी बसविलेल्या 'खडाष्टक' या नाटकाचा सुंदर प्रयोग करून दाखविण्यांत आला.

अशा रीतीनें दि. १३ डिसेंबर १९५६ रोजीं रात्रीं सुमारें २॥ वाजतां नाटयमहोत्सवाची समाप्ति झाली.

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

संघ वार्ता

(प्रा.) श्री. गो. काशीकर
सरचिटणीस, वि. सा. संघ
यांजकडून

केंद्रवृत्त, नागपूर

कार्यकारी मंडळाची सभा ७ वी

विदर्भ साहित्य संघाच्या केंद्रीय कार्यकारी मंडळाची ७ वी सभा रविवार दि. २९-११-५६ रोजीं उपाध्यक्ष श्री. ना. रा. शेंडे यांच्या अध्यक्षतेखाली केंद्रीय कार्यालयांत सकाळीं ८-३० वा भरली.

(१) प्रथम सरचिटणिसांनी मागील सभेचा अहवाल वाचून दाखविला व तो सर्वानुमतें मंजूर झाला.

(२) संमेलनाची रूपरेषा, उद्घाटक, तारखा इ. बाबींवर विचारविनिमय झाला. संमेलनाध्यक्षाचे जागीं तीन नांवें सुचविण्यांत आलीं. संमेलनाच्या व्यवस्थेंत आवश्यक ते बदल करण्याचे अधिकार अध्यक्षांना देण्यांत आले.

(३) क्र. १४६ ते १९० (क्र. ब १७० व १७५ वगळून) पर्यंत आलेल्या आवेदनपत्रांना मंजुरी देण्यांत आली.

(४) अध्यक्षांच्या परवानगीने कै. नेने स्मृतिग्रंथसमितिसंबंधी व मध्यप्रदेश शासन साहित्य परिषदेने गौरव केल्याबद्दल कविभूषण श्री. अण्णासाहेब खापर्डे, डॉ. वि. भि. कोलते, श्री. सुरेश डोळके, श्री. गो. रा. दोडके व श्री. भा. आ. पांढरीपांडे यांच्या अभिनंदनाचा असे दोन ठराव मंजूर झाले.

(५) खामगांव शाखेच्या मालमत्तेसंबंधीं विचार करण्यांत येऊन हा प्रश्न विश्वस्तांच्या सल्ल्यानुसारच सोडविणें आवश्यक वाटल्यामुळे विश्वस्तांवर सोपवावा असें ठरलें.

(६) युगवाणीचा मार्च महिन्यांतील "ललित साहित्य अंक" नागपूरला छापणेंच सोईचें होईल, करिता तत्संबंधी मुद्रणाची व्यवस्था येथेच करावी असें ठरलें.

(७) कार्यालयीन कर्मचाऱ्यांच्या निवेदनाचा विचार करण्यांत आला. त्यांनी निवेदन परत घ्यावें व नंतर त्यांच्या मागण्यांचा विचार समितीने करावा असें ठरलें. वेतनमान व नियम या उपसमितीवर प्रा. वैतुले व श्री. सगदेव यांची नेमणूक करण्यांत आली.

(८) परीक्षा समितीचे संचालक म्हणून श्री. रा. पु. सगदेव यांची एकमताने निवड करण्यांत आली.

* *

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

सांस्कृतिक कार्यक्रम समिति

विदर्भ साहित्य संघाच्या सांस्कृतिक कार्यक्रम समितीतर्फे दि. २६-११-५६ रोजीं सायं. ६ वा. गडकरी स्मारक सभागृहांत महाराष्ट्रांतील शिक्षणतज्ज्ञ व थोर सामाजिक कार्यकर्ते आचार्य श्री. बाबूराव जगताप यांचें "आजच्या महाराष्ट्रांतील सामाजिक सुधारणेचें स्वरूप व आवश्यकता" या विषयावर व्याख्यान झालें.

सांस्कृतिक कार्यक्रम समितीद्वारा आयोजित, प्राध्यापकीय व्याख्यानमालेतील पांचवें व्याख्यान, सायन्स कॉलेजचे विद्वान प्राध्यापक श्री. व्यं. रा. वनमाळी यांचें "Three Immodest Plays" या विषयावर सौ. कुसुमावती देशपांडे यांचे अध्यक्षतेखाली बुधवार दि. २८-११-५६ सायं. ६ वा. इंग्रजींत व्याख्यान झालें.

त्याचप्रमाणे सांस्कृतिक कार्यक्रम समितीतर्फे प्रा. ना. सी. फडके यांचीं शनिवार दि. १, रविवार दि. २ व सोमवार दि. ३ डिसेंबर रोजीं रोज सायं. ६ वाजतां अनुक्रमें "ललित साहित्याची प्रतिज्ञा आणि कसोटी", "ललित साहित्याची शक्ति आणि मर्यादा" व "कादंबरीचें स्वरूप आणि तंत्र" अशीं तीन व्याख्यानें झालीं.

या कार्यक्रमांना नागपुरांतील विद्यार्थी वर्ग व नागरिक बहुसंख्येने उपस्थित होते.

* *

कै. हरिभाऊ नेने स्मृतिग्रंथ समिति

विदर्भ साहित्य संघाचे पूर्वाध्यक्ष व एक थोर व्यासंगी संशोधक कै. हरि नारायण नेने यांचा स्मृतिग्रंथ विदर्भ साहित्य संघाचे वतीने संपादित केला जावा, ह्या ठरावानुसार कार्यकारी मंडळाने दि. २५-११-५६ ला पुढील उपसमिति नियुक्त केली—

अध्यक्ष : म. म. वा. वि. मिराशी; **आमंत्रक** : सरचिटणीस श्री. श्री. गो. काशीकर; **सभासद** : संघाध्यक्ष श्री. बाळासाहेब ढवळे, श्री. ना. रा. शेंडे, श्री. भाऊसाहेब माडखोलकर, डॉ. वि. भि. कोलते, डॉ. मा. गो. देशमुख, प्रा. ग. त्र्यं. देशपांडे, प्रा. पां. कृ. सावळापूरकर, व श्री. दे. गो. लांडगे.

ह्या समितीला अधिक सभासद स्वीकृत करून घेण्याचा अधिकार देण्यांत आला.

* *

नाट्यसमिति

विदर्भ साहित्य संघ, नाट्य समितीच्या सहकारी नाट्यौत्सव समितीतर्फे दि. ६ ते ११ डिसेंबर पर्यंत विशाल प्रमाणावर नाट्योत्सव साजरा करण्यांत आला. कार्यक्रमांची माहिती अन्यत्र दिली आहे.

* *

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

गडकरी स्मृतिदिन

विदर्भ साहित्य संघाच्या गडकरी स्मारक समितीची सभा दि. २३-१२ रोजीं सायं ५-३० वा. भरली. सभेने आगामी गडकरी स्मृतिदिनाचा कार्यक्रम निश्चित केला.

* *

माननीयांच्या भेटी

विदर्भ साहित्य संघ मंदिरास नटवर्य श्री. केशवराव दाते यांनी दि. ९-१२ ला सकाळीं ९-३० वाजतां भेट दिली. त्या वेळीं विदर्भ साहित्य संघाच्या कार्यकर्त्यांसमोर रंगभूमीविषयी मोकळेपणाने आपले विचार त्यांनी मांडले. प्रश्नोत्तरांच्या रूपाने त्यावर उद्बोधक अनौपचारिक चर्चाहि करण्यांत आली.

केंद्रीय सरकारचे उच्चाधिकारी श्री. आ. रा. देशपांडे उर्फ कवि अनिल हे नुकतेच परदेशांतून परत आले. त्याबद्दल दि. २५-१२-५६ रोजीं त्यांचा सत्कार करण्यांत आला. "परदेशांतील अनुभव" यावर त्यांचें भाषण झालें.

* *

शाखा वृत्त

पुसद

विदर्भ साहित्य संघ घटना नियम १९ ए शाखारचना नियम ३ अन्वयें पुसद शाखेच्या कार्यकारी मंडळावर संघाध्यक्षांनी श्री. तु. ना. पांडे यांची नियुक्ति केली.

* *

विदर्भ साहित्य संमेलन, १९ वें अधिवेशन, गोंदिया

दि. २४-२५ व २६ डिसेंबर १९५६ रोजीं गोंदिया येथे विदर्भ साहित्य संमेलन भरण्याचें ठरलें होतें व तशी सूचना सर्व सभासदांना दिली गेली होती. आता ह्या तारखा कांही अपरिहार्य अडचणीमुळे बदलल्या असून संमेलन जानेवारी १९५७ च्या दुसऱ्या किंवा तिसऱ्या आठवड्यांत भरणार आहे. निश्चित तारखा ठरल्यानंतर तशी प्रसिद्धी दिली जाईल.

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
मकर संक्रांत, १९२३
विदर्भ साहित्य संघ

विदर्भ साहित्य संघ परीक्षा समिति वृत्त

जानेवारी १९५७ च्या परीक्षा

परीक्षा समय—शनिवार दि. १९ जानेवारीपासून विभिन्न केंद्रांत परीक्षा आरंभ होतील.

परीक्षार्थ्यांना सूचना—(१) परीक्षार्थ्यांनी दि. १५ च्या आंत आपापल्या केंद्राधिकाऱ्यां-कडून प्रवेशपत्रें मिळवून स्थान व समयाची माहिती प्राप्त करून घ्यावी. कार्यालयाकडे पत्र-व्यवहार करूं नये.

(२) अपरिहार्य कारणास्तव उपस्थित राहावयाचें नसल्यास परीक्षेपूर्वी केंद्राधिकाऱ्यांना आवेदन पाठवावें.

केंद्राधिकाऱ्यांना सूचना—(१) आलेलें सर्व साहित्य ताबडतोब तपासून पाहावें व कमी अधिकची सूचना त्वरित कार्यालयास करावी.

(२) परीक्षा संपतांच पहिल्या डाकेने सर्व साहित्य व हिशेब परीक्षा समितीच्या कार्या-लयाकडे रवाना करावें.

पारंगत व साहित्याचार्य—या दोन्ही सर्वोच्च परीक्षांबाबतची माहिती आवश्यक असणाऱ्यांनी ।।. चीं तिकिटें पाठवून पत्रव्यवहार करावा.

पारगंत ही एम्. ए. समकक्ष सर्वोच्च परीक्षा वर्षांतून एकदाच व तीहि जानेवारींत होते. प्रस्तुत परीक्षेंत कमींत कमी द्वितीय श्रेणींत सर्वप्रथम येणाऱ्यास डॉ. शिंगणापूरकर सुवर्ण पदक दिलें जाईल.

रा. पु. सगदेव,
संचालक, परीक्षा समिति

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

विदर्भ साहित्य संघाचे उद्देश आणि गरजा

१. विदर्भ साहित्य मंदिराची इमारत पूर्ण करणें व नाटयगृह बांधणें.

२. वि. सा. संघाच्या परीक्षांना व्यापक आणि सर्वोपयोगी स्वरूप देणें.

३. वि. सा. सं. चें मुखपत्र युगवाणी आर्थिक दृष्टीने स्वावलंबी करून उत्तरोत्तर त्याचें स्वरूप सर्वांगीण करणें.

४. वि. सा. सं. च्या वतीने दुर्मिळ ऐतिहासिक, शैक्षणिक व वाङ्मयीन ग्रंथांचें प्रकाशन

५. मराठी भाषेच्या हिताचें प्रातिनिधिक स्वरूपाचें कार्य करणें.

मराठी-प्रेमी जनतेने तनमनधनाने विदर्भ साहित्य संघाला मदत करावी अशी नम्र विनंती आहे.

'युगवाणी' सदस्यांना विनामूल्य. ✳ सभासदत्वाचें वार्षिक शुल्क फक्त तीन रुपये

हें मासिक श्री. पुरुषोत्तम दिवाकर ढवळे यांनी वि. सा. संघाकरितां नारायण मुद्रणालय, धनतोली, नागपूर १ येथें मुद्रित करून संघ-कार्यालय, उत्तर अंबाझरी रस्ता, सीताबर्डी, नागपूर १ येथे प्रकाशित केलें.

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

अनुक्रमणिका